मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

मुंबई/ पालघर | मुंबई, मंगळवार, १ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १०१ | पाने- ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail. com



हिटलरनंतर नेतान्याहू हे सर्वात मोठे दहशतवादी

पान ४

## ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

**नवी दिल्ली:** ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना यंदाचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मिथुन चक्रवर्ती यांना ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात हा पुरस्कार दिला जाणार आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील मिथुन चक्रवर्ती यांच्या अभूतपूर्व योगदानासाठी हा पुरस्कार त्यांना देण्यात येत असल्याचं निवड समितीने म्हटलं आहे. हा पुरस्कार ८ ऑक्टोबर रोजी मिथुन चक्रवर्ती यांना प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. हिंदी सिनेविश्वात मिथुन चक्रवर्ती यांनी आपल्या कारकिर्दीत एकापेक्षा एक असे हिट चित्रपट केले आहेत. विनोदाचं अचूक टायमींग आणि त्यांच्या डान्स स्टेप्सचे आजही लाखो चाहते आहेत.

# शिंदे एक्स्प्रेस सुस्साट... घेतले तब्बल 38 निर्णय

# देशी गाय आता 'राज्यमाता - गोमाता'

## कुणबी दाखले मिळवण्यातील अडचणी होणार आता दूर



**प्रतिनिधी**

**मुंबई**

शिंदे सरकारने आज देशी गायींना ‘राज्यमाता-गोमाता’ म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये महाराष्ट्रातील देशी गायींना ‘राज्यमाता-गोमाता’ घोषित करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती हा प्रस्ताव मान्य करून यासंदर्भातला शासन आदेश जारी करण्यात आला.

राज्यात विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. एकीकडे विरोधक राज्यातील विविध विषयांवरून सरकारवर टीकेची झोड उठवत आहेत, तर दुसरीकडे महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर निर्णयांचा धडाका लावला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही मंत्रिमंडळाची बैठक महत्त्वपूर्ण मानली जात होती. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत तब्बल ३८ महत्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये राज्यातील होमगार्ड यांच्या भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याचा लाभ सुमारे ४० हजार होमगार्डना होणार आहे, तसेच कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ, तसेच अनुकंपा धोरणाही लागू करण्यात येणार,

पान 3 वर

### शिंदे समितीचा दुसरा-तिसरा अहवाल स्वीकारला

माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या समितीचा दुसरा व तिसरा अहवाल आज मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला. त्यातील निरीक्षणांची व शिफारशीची नोंद घेऊन, त्यानुसार कार्यवाही करण्यास निर्देश देण्यात आले. मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती विहित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती शिंदे समितीने आपला दुसरा अहवाल डिसेंबर २०२३ मध्ये शासनास सादर केला होता. हा अहवाल सादर करताना समितीने पूर्ण महाराष्ट्रभर दौरे केले. विविध जिल्हाधिकारी त्यांच्या इतर समित्या इतर अधिकारी यांच्याशी चर्चा करून शोधलेले कागदपत्रे आणि त्या अनुषंगिक बाबीवर त्यांना निष्कर्ष आणि जी निरीक्षणे दिसली त्याच्या आधारे दुसरा अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये १४ शिफारशी शासनास सादर करण्यात आल्या होत्या. या शिफारशींवरील कार्यवाहीबाबत विविध विभागांना आजच्या बैठकीत निर्देश देण्यात आले.

### धारावीतील अपात्र झोपडीधारकांसाठी परवडणारी भाडेतत्त्वावरील घरे योजना

धारावीतल्या अपात्र झोपडीधारकांसाठी परवडणारी भाडेतत्त्वावरील घरे योजना राबवण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.धारावी पुनर्विकास प्रकल्पाने या संदर्भात झोपडपट्टीचा सर्व्हे तातडीने पूर्ण करून पात्र आणि अपात्र झोपडपट्टी धारकांची संख्या निश्चित करावयाची आहे. त्याप्रमाणे त्यांच्यासाठी किती जमीन लागेल, तेही निश्चित करायचे आहे. क्रेडीट लींक सबसिडी अंतर्गत राज्याशासनावर कोणत्याही आर्थिक दायित्व येणार, नाही याची दक्षता घ्यायची आहे. या दायित्वाची जबाबदारी विशेष हेतू कंपनीची राहील. हे धोरण अन्य कोणत्याही प्रकल्प लागू होणार नाही.

- कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ, अनुकंपा धोरणही लागू करण्यात येणार
- ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय
- ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गाच्या कामाला गती देणार. एमएमआरडीएला बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास मान्यता
- ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास गती देणार, १२ हजार २०० कोटींच्या सुधारित आराखड्यास मान्यता
- ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गासाठी १५ हजार कोटी कर्जरूपाने उभारणार
- देशी गाईंच्या पालन पोषणासाठी अनुदान योजना
- भारतीय खेळ प्राधिकरणाला आकुर्डी, मालाड व वाढवण येथील जागा नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणार
- रसायन तंत्रज्ञान संस्थेस ठाणे येथील मौजे खिडकाळीची जागा
- राज्य जलसंपत्ती माहिती केंद्र स्थापणार, जलस्त्रोतांचे उत्तम नियोजन करणार
- जळगाव जिल्ह्यातील भागपूर उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता.३० हजार हेक्टर जमीन सिंचित होणार
- लातूर जिल्ह्यातील हासाळा, उंबडगा, पेठ, कव्हा कोल्हापूर बंधाऱ्याच्या कामास मान्यता
- धुळ्याच्या बीएपीएस स्वामीनारायण संस्थेस ग्रामस्थांच्या विकासासाठी जमीन
- रमाबाई आंबेडकर नगर, कामराजनगरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती देणार. एमएमआरडीए ला जमीन अधिमूल्य भरण्यास सवलत
- केंद्राच्या मिठागराच्या जमिनी राज्य शासनाकडे हस्तांतरित करणार, दुर्बलांसाठी घरांच्या योजनांना वेग येणार
- पालघर जिल्ह्यातील मुरबे येथे बहुउद्देशीय बंदर प्रकल्प जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर विकासक
- धारावीतील अपात्र झोपडीधारकांसाठी परवडणारी भाडेतत्त्वावरील घरे योजना. धारावी पुनर्वसन प्रकल्पावर जबाबदारी
- सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा वाढवून २० लाख
- अनुसूचित जाती, नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी कृषी स्वावलंबन योजनेचे आर्थिक निकष वाढवले अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ होणार
- सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ
- जामखेडच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सूत गिरणीला अर्थसहाय्य करणार
- राज्यातील होमगार्डांच्या भत्त्यात भरीव वाढ. सुमारे ४० हजार होमगार्डना लाभ
- नाशिकचे वैद्यकीय पदवी महाविद्यालय व रुग्णालय शासनाच्या अखत्यारीत घेणार
- आयुर्वेद, युनानी महाविद्यालयातील पदभरतीसाठी निवड समिती
- राज्यातील आणखी २६ आयटीआय संस्थांचे नामकरण
- आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ
- श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर समितीवरील सदस्यांची संख्या वाढवून १५ करणार
- अधिसंख्य कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित
- बार्टीच्या धरतीवर वनार्टी स्वायत्त संस्था
- मेट्रो तीन प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मुद्रांक शुल्कात सवलत
- जिल्हा परिषदेतील २००५ नंतर रुजू कर्मचाऱ्यांना एक वेळ पर्याय
- पंचगंगा नदी प्रदूषणासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अद्यावत करणार
- राज्यात विशेष शिक्षक पदाची निर्मिती, ४८६० पदे
- शासन हमी शुल्काचा दर कमी करण्याचा निर्णय. हमी शुल्क माफी मिळणार नाही
- अवयवदान व अवयव प्रत्यारोपणासाठी यंत्रणा. जनजागृतीवर भर
- माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा तिसरा अहवाल स्वीकारला
- राज्यातील सैनिकी शाळांसाठी आता सुधारित धोरण
- डाळिंब, सीताफळ इस्टेट उभारणार उत्पादकांना मोठा लाभ
- महसुली उत्पन्न वाढवण्यासाठी मुद्रांक अधिनियमात सुधारणा

## सिद्धा अडचणीत; CBI नंतर ED सक्रीय...

**बंगळूरु :** कर्नाटकातील बहुचर्चित म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट अथॉरिटी (MUDA) मधील घोटाळयाप्रकरणी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. आता अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) त्यांच्याविरुद्ध पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. गेल्या आठवड्यात कर्नाटक लोकायुक्तांनी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि इतरांविरुद्ध फसवणूक आणि इतर कलमांखाली एफआयआर दाखल केला होता. गेल्या काही दिवसांपूर्वी याचिकाकर्ते स्नेहमोयी कृष्णा यांच्या याचिकेवर निर्णय देताना न्यायालयाने मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले होते.

## 'देवाला राजकारणापासून दूर ठेवा'

### सर्वोच्च न्यायालयाची नायडूंना तंबी

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली**

कथित तिरुपती प्रसाद भेसळ प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची तंबी सोमवारी तिरुपती मंदिराच्या प्रसादातील कथित भेसळीच्या प्रकरणावर झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयानं आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडूंच्या सरकारवर ताशेरे ओढत, 'देवाला राजकारणात आणू नका,' असं दरडावलं. काही दिवसांपूर्वी नायडूंनी पत्रकार परिषद घेत तिरुपती मंदिरात वाटल्या जाणाऱ्या प्रसादरूपी लाडूमध्ये याआधीच्या जगनमोहन रेड्डी सरकारच्या काळात, प्राण्यांच्या चरबीची भेसळ असलेलं तूप वापरल्याचा दावा केला होता.

या याचिकेची सुनावणी न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या दोन सदस्यीय खंडपीठाकडं होती. खंडपीठानं नोंदवलेल्या मौखिक निरीक्षणानुसार, 'ज्या तूपाच्या नमुन्यात भेसळ आढळली होती ते तूप मंदिर प्रशासनाकडून नाकारण्यात आलं होतं. प्राथमिक निरीक्षणानुसार लाडू बनवण्यासाठी त्या तूपाचा वापर झाला नव्हता.'

अशाप्रकारचं भेसळयुक्त तूप हे लाडू बनवण्यासाठी वापरल्याचा कोणताही ठोस पुरावा नसल्याचंही खंडपीठानं नोंदवलं. खंडपीठानं नायडूंनी पत्रकार परिषदेत केलेल्या वक्तव्यावरही आक्षेप नोंदवला. 'जर तुम्ही या बाबतीत एसआयटी (विशेष तपास पथक) स्थापन करून त्याची चौकशी करत होता, तर अशाप्रकारचं सार्वजनिक विधान करण्याची काय आवश्यकता होती?" असा प्रश्न खंडपीठानं नायडूंना केला. 'जर या तुपाचा अहवाल तुम्हाला जूलै महिन्यात मिळाला होता तर तुम्ही त्याबद्दल सप्टेंबर पर्यंत वाट का पाहिली?' असा प्रश्नदेखील खंडपीठानं केला. या अहवालाची पुन्हा दुसऱ्या कोणाकडून तपासून का पाहण्यात आलं नाही, यावरही खंडपीठानं तिरुपती मंदिराच्या व्यवस्थापनाकडं आश्चर्य व्यक्त केलं. 'संविधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीनं कोणतंही विधान करण्याआधी सर्व तथ्य तपासायला हवीत,' असं नोंदवत सर्वोच्च न्यायालयानं नायडूंना फटकारलं.

## कामगार विमा रुग्णालयांमध्ये 'गडबड'

# निवडणुकीच्या तोंडावर नियमबाह्य खरेदीसाठी मंत्र्यांचा दबाव

**शाम देऊलकर**

**मुंबई**

टेंडर प्रक्रियेत गडबड करून नियमबाह्य कोट्यावधीची औषधे मागवण्याचा घाट कामगार विमा रुग्णालयांमध्ये घातला जात आहे. आपल्या मर्जीतील ठराविक ठेकेदारांकडून ठराविक औषधांची यादी दस्तुरखुद्द आरोग्य मंत्र्यांनीच रुग्णालयांना दिली असून त्यानुसार मागणी नोदवण्याची सूचना देण्यात आली आहे. त्यामुळे अधिकारी चक्रावले आहेत. निवडणूक निधी वसुलीची प्रक्रिया तर सुरू नाही ना, अशी चर्चा आरोग्य विभागात रंगली आहे.

राज्यात २० राज्य विमा कामगार रुग्णालये आहेत. त्याचे मुख्यालय लोअर परेल येथे आहे. या रुग्णालयात औषधे आणि इतर वैद्यकीय सामग्रीचा साठा दर तीन महिन्याला तपासून आवश्यकतेनुसार मागणी नोंदवली जाते. अपवादात्मक परिस्थितीत दोन तीन महिन्याचा अधिकचा साठा मागवला जातो. त्यामध्ये ३०० प्रकारची औषधे व सामग्रीचा

### औषधे खरेदीत मोठा भ्रष्टाचार

समावेश त्यामध्ये आहे. दर तीन महिन्याला सुमारे १८ ते २० कोटींची औषधे व सामग्री लागते.

नियमित प्रक्रिया डावलण्यास एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विरोध दर्शवला. तेव्हा विरोध करणाऱ्या क्लास वन अधिकाऱ्याची त्याच रात्री परस्पर उचल बांगडी केली. बदलीचा सरकारी आदेश देता नियमबाह्य बदली करून त्याच्या कनिष्ठ अधिकाऱ्यामार्फत हा साठा मागवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे आरोग्य संचालनालयात मोठी धांदल उडाली आहे. वरिष्ठ अधिकारी प्रचंड दबावत असल्याचे बोलले जात आहे.

विशेषतः १२ पैकी दहा दर - कंत्राट पुरवठादारांची मुदत येत्या ३१ ऑक्टोबरला संपत आहे. नवीन दर कंत्राट पुरवठादार यादी बनविण्याची प्रक्रिया दिल्लीतून केंद्रीय विभागाने सुरू केली आहे. तरी मुदत संपत असणाऱ्या मोजक्या मर्जीतील पुरवठादारांकडून वर्षभराचा साठा घेण्यासाठी मंत्र्यांकडून दबाव येत आहे. त्यामुळे यात मोठा भ्ष्टाचार होत असल्याची चर्चा आहे.

### घटनाक्रम...

- *७ ऑगस्ट रोजी जुलै ते डिसेंबर २०२४ पर्यंतचा साठा मागविण्याची रीतसर वर्क ऑर्डर देण्यात आली. ती २६ कोटींची होती.*
- *ही ऑर्डर रद्द करून वर्षभराच्या औषध साठ्याच्या नियमबाह्य खरेदीसाठी कामगार विमा रुग्णालयांचे मेडिकल डायरेक्टर डॉ. अलंकार खानविलकर यांच्यावर दबाव येत होता. त्यांनी दबाव झुगरला त्यामुळे त्यांची १८ सप्टेंबर रोजी तात्काळ बदली करण्यात आली. त्याचा चार्ज डॉ शशिकांत कोलनुरकर यांना देण्यात आला.*
- *१९ सप्टेंबर रोजी दिलेल्या सर्व प्रशासकीय वर्क ऑर्डर थांबवण्यात आल्या.*
- *२३ सप्टेंबर रोजी आधीच्या सर्व ऑर्डर रद्द करण्यात आल्या.*
- *२४ सप्टेंबर रोजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी लोअर परेल येथे आयुक्तालयात मीटिंग घेऊन वर्षाचा साठा मागविण्याच्या सूचना दिल्या. मंत्र्यांच्या सूचनेनुसार कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याचे सूत्रांनी सांगितले.*

### फक्त ७५ औषधांसाठी दबाव

निवडणुकीच्या तोंडावर आरोग्यमंत्र्यांनी रुग्णालयांच्या प्रमुखांना बोलावून सुमारे सव्वाशे कोटींची ठराविक ७५ औषधे प्रत्येकाने मागवलीच पाहिजेत अशी तंबी दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. दि. २४ सप्टेंबर रोजी मुख्यालयात ही बैठक बोलावली होती. त्यात त्यांनी आधीची नियमित टेंडर प्रक्रिया आणि वर्क ऑर्डर तातडीने रद्द करण्यास सांगितले. तसेच तीन महिण्याऐवजी पुढील एक वर्षाचा साठा एकदाच मागवण्याच्या तोंडी सूचनाही त्यांनी दिल्या. आतापर्यंतच्या काळात अशी घटना कधीच घडली नसल्याने अधिकारी संभ्रमात आहेत.

राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस,१ ऑक्टोबर २०२४

रक्तदात्यांचे आभार
जीव वाचवण्यासाठी.



साजरी करत आहे,
20 वर्षे
रक्तदानाची
रक्तदात्यांचे आभार

आपत्कालीन परिस्थितीमध्ये आणि थॅलेसीमिया रुग्णांसाठी रक्त संक्रमण करण्याकरिता
निरोगी ऐच्छिक रक्तदात्यांचे नियमित रक्तदान आवश्यक असते.

रक्तदान करा - जीवन द्या !

रक्तदानानंतर थोड्या कालावधीमध्ये शरीरात रक्त पुन्हा निर्माण होते.

RAKTDAAN
KAR KE DEKHO ACHHA LAGTA HAI

आजच आपल्या नजिकच्या
सरकारमान्य रक्त केंद्रामध्ये रक्तदान करा!

- रक्तदान अत्यंत सुरक्षित आहे.
- रक्तदानासाठी तुमची फक्त ३० मिनिटे वेळ द्या आणि ४ व्यक्तींचे प्राण वाचवा.

PRO/1443/ADV/2024-25

रक्तदानासाठी आरोग्यसेतु ॲप डाउनलोड करा किंवा www.raktkosh.in वर नोंदणी करा.

NBTC राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद National Blood Transfusion Council
बृहन्मुंबई महानगरपालिका
मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्था
अधिक माहितीसाठी संपर्क/स्कॅन करा
AIDS Helpline 1097
eRaktkosh Helpline
9650816031
www.mdacs.org.in

एचआयव्ही तपासणी सर्व महानगरपालिका / सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत उपलब्ध आहे.

२ वृत्तमानस पालघर, मुंबई
मुंबई, मंगळवार, १ ऑक्टोबर २०२४

## आमदार मंगेश कुडाळकर यांच्या हस्ते विजेत्यांचा सन्मान

**मुंबई :** शिवसेना कुर्ला नेहरूनगर विधानसभा क्षेत्राच्या वतीने आमदार मंगेश कुडाळकर यांच्या नेतृत्वाखाली गणेशोत्सवानिमित्त भव्य घरगुती गणेश सजावट स्पर्धा २०२४ आयोजीत करण्यात आली होती. आमदार मंगेश कुडाळकर यांच्या उपस्थिती मध्ये नुकताच या स्पर्धेचा निकाल जाहीर होऊन बक्षीस वितरण समारंभ पार पडला आहे. या स्पर्धेतील विजेते, प्रथम पारितोषिक गणेश बसणकर, द्वितीय योगेश लोंढे, तृतीय भूषण देशमुख, प्रथम उत्तेजनार्थ ऋषिकेश घाडगे, द्वितीय उत्तेजनार्थ ओंकार साळुंके, सर्वोत्कृष्ट मूर्ती राजेश मांजरेकर या विजेत्यांना आमदार मंगेश कुडाळकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले असून याप्रसंगी श्री कुडाळकर यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे. या स्पर्धेत कुर्ल्यातील जवळपास 155 घरगुती गणेश सजावट स्पर्धेकांनी भाग घेतला होता.



## थोडक्यात

### वलय ग्रुप चित्रप्रदर्शन आजपासून जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये

**मुंबई:** सात कलाकारांच्या आगळ्यावेगळ्या रंगकृतींचा समावेश असलेले रंग वलय हे ग्रुप प्रदर्शन 1 ऑक्टोबर 2024 पासून जहांगीर आर्ट गॅलरी, काळा घोडा, फोर्ट येथे सकाळी 11 ते सायंकाळी 7 वाजता या वेळेत भरविण्यात आले आहे. या ग्रुप चित्रप्रदर्शनामध्ये जितेंद्र धरणे, इनायत शिदवणकर, दयानंद देसाई, हेमंत थोरात, पूनम साळवी, परेश साळवी आणि अमोल तांबे यांच्या चित्रकृती पाहता येतील. निसर्ग व निसर्ग चक्र यावर आधारित ही चित्रे मूर्त व अमूर्त स्वरूपातील आहेत. याशिवाय विविध माध्यमांचा वापर करून रेखाटलेली लँडस्केप पेंटिंग, क्रिएटिव्ह पेंटिंगचा समावेश आहे. सदर ग्रुप प्रदर्शनाचे उद्घाटन अकुटी डिझाईन हाउसच्या उर्मिला घाटगे यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी 5 वाजता होईल.

### राणीची बाग बुधवारी खुली; गुरुवारी बंद

**मुंबई:** महात्मा गांधी जयंती निमित्त बुधवार, २ ऑक्टोबर २०२४ रोजी सार्वजनिक सुटी आहे. असे असले तरी, बुधवार, २ ऑक्टोबर २०२४ रोजी वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय जनतेकरिता खुले राहणार आहे. तर दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी बंद असेल, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कळविण्यात येत आहे. भायखळा (पूर्व) परिसरातील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय साप्ताहिक सुटीनिमित्त दर बुधवारी बंद असते. मात्र, बृहन्मुंबई महानगरपालिकेने यापूर्वी मंजूर केलेल्या एका ठरावानुसार बुधवारी सार्वजनिक सुटी आल्यास त्यादिवशी उद्यान व प्राणिसंग्रहालय जनतेसाठी खुले राहते, तर त्याच्या दुसऱ्या दिवशी बंद ठेवण्यात येते.

### निओ शास्त्रीय संगीत फ्यूजन मुंबईत 2 ऑक्टोबरला

**मुंबई**डॉ. रतीश तागडे यांनी "VIBGYOR" – ही एक निओ शास्त्रीय संगीत फ्यूजन कॉन्सर्टची संकल्पना मांडली आहे. यात ७ चक्रे, ७ म्युझिकल नोट्स, ७ संगीतकार, ७ संगीत शैली आणि ७ रंग यांच्यातील परस्पर संबंध रसिकांना अनुभवता येणार आहे. हा कार्यक्रम दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्राच्या वतीने २ ऑक्टोबरला सायंकाळी ५.३० वाजता केंद्राच्या वा. वा. गोखले सभागृहात होईल. या मैफिलीत व्हायोलिनवर डॉ. रतीश तागडे, मृदंगमवर श्रीधर पार्थसारथी, कीबोर्डवर अतुल राणिंगा, तबल्यावर ओजस अधिया, बासरीवर निनाद मुळोकर, गायकीवर गंधार देशपांडे, गायनावर शिवानी वासवानी आणि ड्रम्स वर वर प्रियाश पाठक आहेत.

# वसईतील नागरी समस्यांवर नाना पटोले आक्रमक



कामं करा नाहीतर चौकशी लावेन ! - आयुक्तांना कडक इशारा

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार महानगरपालिका हद्दीत नागरी समस्या दिवसेंदिवस वाढत असून, प्रशासनाकडून त्यावर कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात येत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. या समस्यांची तक्रार काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोळे यांच्याकडे केली होती. याच पार्श्वभूमीवर, नाना पटोळे यांनी वसई-विरार महानगरपालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना थेट फोन करून नागरी हिताची कामे त्वरित न केल्यास त्यांच्यावर चौकशी लावली जाईल, असा कडक इशारा दिला आहे.

वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या नागरी समस्या आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे स्थानिक काँग्रेस पदाधिकाऱ्यांमध्ये संताप आहे. पर्यावरण विभागाचे प्रदेशाध्यक्ष समीर वर्तक आणि त्यांचे सहकारी यापूर्वी अनेकवेळा विविध समस्यांवर आवाज उठवून प्रशासनाकडे तक्रार करत आले आहेत. पिण्याच्या पाण्याची समस्या, सर्वधर्मीय दफनभूमीची सोय, तसेच बुडणाऱ्या वसईसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना यांसारख्या समस्यांवर प्रशासनाकडून फक्त लेखी आश्वासने दिली जात आहेत, परंतु कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याची तक्रार काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली होती.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी महानगरपालिकेतील काही अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोपही केले होते. हे आरोप सिद्ध होऊनही या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई झालेली नाही, असे समीर वर्तक यांनी स्पष्ट केले. काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी या भ्रष्टाचाराच्या विरोधात आंदोलने केली, मोर्चे काढले, तसेच आमरण उपोषणही केले, तरीही प्रशासनाने कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत.

वसईतील काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केलेल्या तक्रारीनंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोळे यांनी तातडीने लक्ष घालून महानगरपालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना फोनद्वारे नागरी कामे तत्काळ मार्गी लावण्याचे आदेश दिले. त्यांनी आयुक्त पवार यांना नागरी हिताच्या कामांमध्ये दिरंगाई चालूच राहिल्यास त्यांच्यावर चौकशी लावण्यात येईल, असा सज्जड दम भरला.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी 2008 पासून अनेक नागरी समस्या मांडल्या आहेत, ज्यात 69 गावांच्या पाण्याच्या योजनेचा समावेश आहे. ही योजना अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, आणि नागरिकांना पाण्याच्या तीव्र समस्येला तोंड द्यावे लागत आहे. तसेच, दिवाणमान येथील सर्वधर्मीय दफनभूमीच्या मागणीवरही प्रशासनाने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही.

पर्यावरण तज्ञांनी सुचवलेल्या उपाययोजना, जसे की वसईमधील पाण्याच्या समस्येवर IIT आणि NEERI द्वारे सुचवलेले धरण तलाव (Holding Ponds), यावरही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. नागरिकांच्या समस्या वाढत असताना, महानगरपालिकेने फक्त लेखी आश्वासने देऊन वेळ मारून नेली आहे, असे काँग्रेस पदाधिकाऱ्यांचे मत आहे.

### *आयुक्तांच्या भूमिकेबद्दल नाराजी*

*वसई-विरार महानगरपालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यावर काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्यावर भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये सामील असल्याचा आरोप आहे. स्थानिक काँग्रेसने प्रशासनावर वेळोवेळी कारवाईची मागणी करूनही आयुक्त पवार यांनी कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्यामुळे स्थानिक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी आपल्या संतापाला वाट मोकळी करून दिली आहे.*

### *नागरिकांच्या समस्यांवर लवकरच उपाय?*

*नाना पटोळेंच्या या कडक इशाऱ्यानंतर वसई-विरार महानगरपालिका प्रशासनाची भूमिका काय असेल, आणि नागरिकांच्या समस्या कितपत सुटतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आयुक्त अनिलकुमार पवार यांना दिलेला इशारा आणि काँग्रेसने घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे वसईतील नागरी समस्यांवर काही ठोस उपाययोजना होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.*

# वसईत यंदाच्या पावसात घट

## धरणात मात्र पाण्याची मुबलकता, नागरिक निश्चिंत

### 272 मिमी कमी पाऊस ; पावसामुळे एक बळी

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार परिसरात यंदाच्या वर्षी पाऊस समाधानकारक झाला असला, तरी गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी पावसाचे प्रमाण कमी आहे. 1 जून ते 30 सप्टेंबर या कालावधीत वसईत एकूण २६२३ मिमी पाऊस पडला, जो गेल्या वर्षीच्या तुलनेत २७२ मिमीने कमी आहे. 2023 मध्ये या काळात एकूण २८९५ मिमी पाऊस झाला होता, जो या वर्षाच्या तुलनेत अधिक होता. तरीही, यंदा देखील पाण्याच्या समस्येची चिंता नाही, कारण वसई-विरार महानगरपालिकेला पाणी पुरवणारी धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली आहेत आणि या धरणांनी वर्षभरात चार वेळा ओव्हरफ्लो देखील केले आहे. त्यामुळे वसईकरांना या वर्षी पाण्याची कमतरता भासणार नाही.

गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे दोन जणांचा बळी गेला होता. तर यावर्षी देखील एका व्यक्तीचा मृत्यू पावसामुळे झालेला आहे. मंजुळा झा नामक महिलेला यावर्षीच्या पावसात जीव गमवावा लागला. शासनाने त्यांच्या कुटुंबीयांना सुमारे ४ लाख रुपयांचा आर्थिक मदतीचा धनादेश दिला आहे. त्यामुळे शासनाच्या तातडीच्या प्रतिसादाची दखल घेतली जात आहे.

नुकत्याच झालेल्या परतीच्या पावसाने वसई आणि आसपासच्या परिसरात मुसळधार पाऊस झाला. परिणामी, धरणे पुन्हा तुडुंब भरली असून, पाण्याचा पुरवठा वर्षभर सुरळीत राहील, असे स्पष्ट झाले आहे. वसईकरांना यामुळे पाण्याची चिंता करावी लागणार नाही, कारण धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा आहे.

तथापि, परतीच्या पा४वसाचे सावट अद्याप वसई परिसरावर आहे. हवामान विभागाने येत्या काही दिवसांत हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे नागरिकांना अजून काही काळ सावध राहावे लागेल.

धरणांमध्ये पाण्याची मुबलकता आणि पालिकेच्या तयारीमुळे वसईतील नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर यंदा पावसाचे प्रमाण कमी असले तरी, धरणांची स्थिती उत्तम आहे आणि त्याचा फायदा नागरिकांना होणार आहे.

### *पालिकेची पाण्याबाबतची तयारी*

*पालिकेने देखील यंदाच्या पावसाळ्यात पाण्याच्या व्यवस्थापनाची तयारी केली असून, धरणांमधील पाणीसाठ्यावर नियमित निरीक्षण ठेवले जात आहे. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या मते, धरणांमध्ये आवश्यक तो साठा आहे आणि भविष्यात कोणत्याही प्रकारची पाण्याची समस्या निर्माण होणार नाही.*

### *वर्षभरासाठी पाणीपुरवठ्याचा प्रश्न निकाली*

*वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरिकांसाठी पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमचा निकाली लागल्याचे दिसत आहे. पालिकेने दिलेल्या माहितीनुसार, धरणांमध्ये वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा आहे. त्यामुळे नागरिकांना येत्या हिवाळ्यात आणि उन्हाळ्यातही पाण्याची चिंता करावी लागणार नाही.*

# आमदार झिशान सिद्दीकी यांचे वांद्रे पूर्व येथील भारत नगर येथे आमरण उपोषण सुरु

■ मुंबई

वांद्रे पूर्वेतील भारत नगर परिसरात आमदार झिशान सिद्दिकी एसआरए विरोधात काल पासून अन्नत्याग करून आमरण उपोषणाला बसले आहेत. भारत नगर येथील झोपडपट्टीचे एसआरए कडून काल पाड कामांची (डिमोलिशन) कारवाई केली जाणार होती. एसआरए च्या याच कारवाईच्या विरोधात आमदार झिशान सिद्दिकी



आक्रमक झाले आहेत. भारत नगर झोपडपट्टीची जागा म्हाडाची असून मात्र SRA आणि विकासकांकडून झोपडपट्टी धारकांवर दादागिरी केली जात आहे, असा आरोप आमदार झिशान सिद्दिकी यांनी केला आहे. आमचा विकासाला विरोध नाही मात्र आमची मागणी आहे की ही म्हाडाची जागा असल्यामुळे म्हाडाकडूनच संपूर्ण विकास व्हायला पाहिजे. जोपर्यंत SRA आणि विकासकाकडून दादागिरी थांबत नाही आणि पाड कामाची कारवाई थांबत नाही, तोपर्यंत मी अन्य त्याग करून आमरण उपोषण करणार आहे. असे आमदार झिशान सिद्दीकी म्हणाले.



*मुंबई : विश्व गोंधळी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आणि भटक्या व विमुक्त जाती संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष विश्वास दोर्वेकर यांना मुंबईत सत्यशोधक समाज आणि दैनिक शिवनेर (मुंबई) यांच्या संयुक्त सहकार्याने सत्यशोधक समाज भूषण पुरस्कार श्री सावता माळी भवन ,भायखळा येथील सभागृहात आयोजित केलेल्या भव्य कार्यक्रमात नुकताच प्रदान करण्यात आला. मुंबई बँकेचे संचालक नंदकुमार काटकर आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांच्या हस्ते सत्यशोधक समाज भूषण पुरस्कार देवून विश्वास दोर्वेकर यांना मुंबईत गौरविण्यात आले*

# आदिवासी विकास हक्क संघर्ष समितीच्यावतीने डॉ.सचिन रेरेंचा सत्कार



प्रतिनिधी
■ मोखाडा

आज सायदे वाघ्याची वाडी येथील ग्रामस्थ सखाराम रेरे सर(माजी विस्तार अधिकारी) यांचे चिरंजीव डॉ.सचिन रेरे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील एम.डी.पदवी प्राप्त केल्या बद्दल आदिवासी विकास हक्क संघर्ष समिती व सायदे ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी आदिवासी विकास हक्क संघर्ष समिती चे अध्यक्ष श्री प्रदीप वाघ यांनी डॉ.सचिन रेरे यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा देताना सांगितले की आपल्या भागातील आदिवासी मुलाने वैद्यकीय क्षेत्रात उत्तुंग यश संपादन केले आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आम्हाला देव दिसत नाही पण वेळ आली का आजार पणा मध्ये डॉक्टर च देव असतो त्यामुळे आपण या डिग्री चा वापर समाजाची सेवा करण्यासाठी करावा अशी अपेक्षा देखील श्री वाघ यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रल्हाद कदम यांनी सांगितले की रेरे परीवार कायमच सामाजिक क्षेत्रात व वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहे,डॉ.सचिन रेरे ने हा वारसा पुढे चालवला आहे.तसेच निलेश झुगरे यांनी देखील डॉ.सचिन यांना शुभेच्छा देताना सांगितले की आम्हा गावकऱ्यांना अभिमान वाटतो व आनंद देखील झाला आहे की डॉ.सचिन रेरे यांनी मिळवलेल्या यशाबद्दल सर्वां कडुनच कौतुक होत आहे.

या कार्यक्रमाला प्रदीप वाघ उपसभापती,जेष्ठ नेते प्रल्हाद कदम,आदिवासी विकास हक्क संघर्ष समिती चे पदाधिकारी,कार्यकर्ते तसेच मान्यवर व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे; माजी नगरसेविका प्रीती म्हात्रे यांची टीका

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार शहर महानगरपालिका रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करते. मात्र, हा खर्च निकृष्ट दर्जाच्या कामांमध्ये वाया जात असल्याचे दिसून येत आहे. रस्त्यांचे डांबरीकरण मुसळधार पावसात टिकत नाही, हे गंभीर चित्र आता वसईत पाहायला मिळत आहे. या परिस्थितीवर माजी नगरसेविका प्रीती दिनेश म्हात्रे यांनी महापालिकेच्या कामकाजावर कठोर शब्दांत टीका केली आहे.

पालिकेने चिंचोटी परिसरातील काही रस्त्यांची दुरुस्ती अवघ्या काही आठवड्यांपूर्वी केली होती. चिंचोटी ते गवळी घरापर्यंत तसेच भजनलाल डेअरी ते कामडीपाडा या रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र, दुरुस्तीनंतर अवघ्या महिन्याभरातच हे रस्ते खड्ड्यांनी भरून गेले आहेत. या घटनेमुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

सोशल मीडियावरही या मुद्द्यावर चर्चा रंगली असून, पाण्यात सर्वात आधी वितळणारा पदार्थ कोणता, या प्रश्नावर वसई-विरार महापालिकेच्या डांबराचे उदाहरण देत लोकांनी उपहासात्मक



वसईत डांबर वितळतेय?

उत्तर दिले आहे. निकृष्ट दर्जाचे डांबर वापरल्याने ठेकेदारांनी चांगले पैसे उकळले आहेत, असा आरोप माजी नगरसेविका प्रीती म्हात्रे यांनी केला आहे. त्यांनी महापालिका प्रशासनाला निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांना देय असलेले बिले रोखण्याची मागणी केली होती. मात्र, याकडे दुर्लक्ष करून पालिकेने ठेकेदारांची बिले अदा केली असल्याचे म्हात्रे यांनी निदर्शनास आणले आहे.

मुसळधार पावसात रस्त्यांचे डांबर वाहून जात असल्यामुळे या कामांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. आधी वाहतुकीस योग्य असणारे रस्ते आता डांबरीकरणामुळे अधिक खराब झाले आहेत. या सर्व स्थितीमुळे वसई-विरार महापालिकेच्या कामकाजावरील नागरिकांचा विश्वास ढासळत चालला आहे. माजी नगरसेविका प्रीती म्हात्रे यांनी या अनियमिततेवर कठोर शब्दांत निषेध नोंदवत ठेकेदार आणि महापालिकेतील अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

पालिका प्रशासनात एक प्रकारची असंवेदनशीलता आहे, जी रस्त्यांच्या कामातील दर्जा आणि नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करते," असे म्हात्रे यांनी सांगितले. नागरिकांचे आयुष्य या निकृष्ट रस्त्यांमुळे धोक्यात येत आहे, आणि हे पालिका प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे घडत असल्याचे त्यांनी सांगितले.

# आमदार दिलीप लांडे यांनी चांदिवलीतील नवरात्रउत्सव मंडळांचा उत्साह वाढवला

■ मुंबई

मुंबई या उत्सव नगरीत सतत उत्सवाची जत्रा असते एका मागोमाग एक उत्सव आणि सन साजरे होत असतात नुकतेच गणपती बाप्पाला मुंबईकरांनी निरोप दिला असून आता अंब्बा मातेचे जलोष्यात आगमन होणार असून नवरात्रौत्सव मंडळाचा जोश वाढला आहे. चांदिवली विधानसभा क्षेत्रामध्ये शिवसेना आमदार दिलीप लांडे यांनी नवरात्री



उत्सवासाठी विभागातील मंडळाना आमंत्रीत करून उत्सवाच्या तयारीची माहिती आमदार दिलीप लांडे स्वतः घेत आहेत. नवरात्रउत्सव मंडळाच्या समस्या सोडून हा नवरात्रीचा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा व्हावा यासाठी सहकार्य केले जात आहे. चांदिवली विधानसभा क्षेत्रातील विविध नवरात्र उत्सव मंडळाची भेट घेऊन ते शुभेच्छा देत आहेत.

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**हस्तांतरण नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ ला अधिन राहून या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की वसई-विरार शहर महानगरपालिका विभाग बऱ्हामपूर तालुका वसई हद्दीतील मालमत्ता क्रमांक VN14/62148/35 ही मिळकत श्रद्धा कन्स्ट्रक्शन ह्यांच्या नावे दाखल आहे.

सदर मिळकत सुहास अनंत मुरुडकर ह्यांच्या नावे हस्तांतरण करण्यासाठी अर्ज केला आहे.सदर मिळकतीबाबत कोणाचीही हरकत,हितसंबंध असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत वसई-विरार शहर महानगरपालिका विभाग नवघर, तालुका वसई या कार्यालयात लेखी कळवावे अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर मिळकत हस्तांतरण करून महानगरपालिका दप्तरी नोंद घेतली जाईल.

**दिनांक:-०१-१०-२०२४**
**विभाग:- बऱ्हामपूर** **सही/-**
**सुहास अनंत मुरुडकर**

**पब्लिक नोटीस**

याद्वारे नोटीस देण्यात येते की, गांव मौजे विरार प., ता. वसई, जि. पालघर येथील शक्ती कॉम्प्लेक्स को-ऑप. हौ. सो. लि. या इमारतीमधील फलॅट नं. २०५, बुसरा मजला, बी/विंग असा फलॅट सौ. सोनाली विनेश मोरे यांनी सौ. पुजा राजकुमार निषाव यांचेकडून दिनांक ३०/०७/२०२४ रोजीच्या रजिस्टर कराराने कायमचा विकत घेतलेला आहे, तरी सदर फलॅटवर अगर त्याचे एखादया भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा वारसा हक्क, हिस्सा, दावा असल्यास त्यांनी तो निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या १११, कपाडीया हाऊस, गावठण रोड, विरार प. येथील कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून १४ दिवसाचें आंत कळवावा, तसे न केल्यास तशा प्रकारचा कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसबंध नाही असे समजून किंवा कोणाचा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल.
कळावे.

**आपला विश्वासू**
**आर. टी. पाठक**
**वकील**
**दिनांक- 01/10/2024**

# बेस्टची भाडे तत्वावरील बस आगीत जळून खाक; बसवाहक जखमी

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट उपक्रमातील भाडे तत्वावरील एक सीएनजी बस इंजिनमध्ये आग लागल्याने ती जळून खाक झाली. या घटनेत बस वाहकाला हाताला भाजल्याने ते जखमी झाले आहेत. तर बस चालक बचावला आहे. सुदैवाने या बसमध्ये कोणी प्रवासी नव्हते. त्यामुळे मोठी हानी टळली. सदर घटना सोमवारी दुपारच्या सुमारास एलबीएस रोड, कांजूरमार्ग, गांधीनगर येथे घडली.

बेस्ट उपक्रमाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, बेस्ट उपक्रमाची (धारावी डेपोची कंत्राटदार मातेश्वरी कंपनीची बस) बसमार्ग क्र.३०३ ही बस वांद्रे स्टेशन (प.)

बसमध्ये प्रवासी नसल्याने मोठी हानी टळली



ते मुलुंड स्टेशन या दरम्यान धावणारी बसगाडी होती. ही बसगाडी सोमवारी दुपारी १.३५ वाजताच्या सुमारास लघुफेरी पूर्ण करून वळण घेऊन वांद्रे येथे जात असताना कांजूरमार्ग, गांधी नगर येथे बसच्या इंजिनमधून अचानकपणे धूर निघू लागला. इंजिनमध्ये आग लागल्याचे लक्षात येताच बस चालक संजय भगवान सूर्यवंशी (५४) यांनी आणि बस वाहक अजित रमेश सराटे यांनी लगेचच सदर बसगाडी गांधीनगर , घाटकोपर येथे रस्त्याच्या एका बाजूला घेतली. त्यावेळी इंजिनमध्ये आग जास्त भडकली होती. हळूहळू आग आणखीन भडकली. तोपर्यंत बस चालक व बस वाहक हे बसमधून बाहेर आले. मात्र या सर्व घटनेत बस वाहक अजित सराटे यांच्या उजव्या हाताला भाजल्याने जखम झाली. बेस्टची बस संपूर्णपणे जळून खाक झाली.

सुदैवाने या बसमध्ये कोणीही प्रवासी त्यावेळी नव्हते. त्यामुळे मोठी हानी टळली. मात्र बसगाडी संपूर्णपणे जळाल्याने बघ्यांची गर्दी जमली होती. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. काही अवधीत या आगीवर नियंत्रण मिळवून आग विझविण्यात आली. मात्र भाडे तत्वावरील बसगाडी जळून खाक झाल्याने वित्तीय नुकसान झाले. दरम्यान, या बसला आग का व कशी काय लागली, आगीचे नेमके कारण काय, याबाबत बेस्ट उपक्रम, स्थानिक पोलीस हे अधिक तपास करीत आहेत.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व), ता. वसई, जि. पालघर - ४०१३०५.
दुरध्वनी : ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र : व.वि.श.म. पापु ५१०/२०२४ दिनांक :- २७/०९/२०२४

**पाणी पुरवठा विभाग, मुख्यालय, विरार पूर्व**
**प्रथम वेळ जाहिर ई-निविदा सूचना**

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील खालील उल्लेखीत कामाचे कोरे निविदा फॉर्म https://mahatendrs.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि. ०१ / १० / २०२४ पासुन उपलब्ध होणार आहेत. ई टेंडरिगं बाबत अधिक माहितीसाठी ई- निविदा कक्ष, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

१. वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना सुर्या टप्पा १ व ३ (जुनी व नवीन सुर्या योजना) १०० द.ल.ली. योजनेच्या मासवण येथील उद्यंन केंद्रामधील Jackwell मधील रेती काढणे.

**सही/-**
**(सुरेंद्र ठाकरे)**
**प्र. कार्यकारी अभियंता**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

जा.क्र.: - वविशम / म.व.ज./ २७७ /२०२४
दि.:- ३०/०९/२०२४

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 101
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - १०१
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

# देवेंद्र फडणवीस 5 ऑगस्टला मातोश्रीवर उद्धव ठाकरेंना भेटले

## वंचितचा खळबळजनक दावा



प्रतिनिधी

■ मुंबई

राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणारा बातमी समोर आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे मुख्य प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी एक सनसनाटी राजकीय दावा केला आहे. भाजप आणि उद्धव ठाकरेंच्या (पक्षामध्ये चर्चा सुरु असल्याचा खळबळजनक दावा मोकळे यांनी केलाय. मोकळेंनी प्रसिद्धी पत्रकात हा दावा केलाय. शिवसेना खासदार संजय राऊत 25 जुलैला मध्यरात्री 2 वाजता, दिल्लीत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांना त्यांच्या निवासस्थानी भेटले होते. तर 5 ऑगस्टला रात्री 12 वाजता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्धव ठाकरेंना भेटायला मातोश्रीवर गेले होते. तिथे या दोघांमध्ये सुमारे 2 तास चर्चा झाली असा गौप्यस्फोट सिद्धार्थ मोकळे यांनी केलाय.

त्यानंतर 6 ऑगस्टला उद्धव ठाकरे दिल्लीला गेले. तिथे ते कोणाला भेटले, त्यांच्यात काय चर्चा झाली, हे उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी जाहीर करावं, असं खुलं आव्हान सिद्धार्थ मोकळे यांनी दिलंय. भाजप आणि महायुती मधील पक्ष हे काही आरक्षणवादी नाहीत, ते आरक्षण विरोधी आहेत हे जनतेला माहित आहे. मात्र उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला आरक्षणवादी मतदारांनी मतदान केलं आहे. गेल्या 5 वर्षातल्या घडामोडी बघता उद्या जर काही उलट सुलट राजकीय घटना घडल्या तर आरक्षणवादी मतदारांची फसवणूक होऊ नये म्हणून आम्ही ही माहिती उघड करीत आहोत, असं सिद्धार्थ मोकळे यांनी म्हटलं आहे.

भाजपाला जिंकून देण्यासाठी काम करत असलेल्या लोकांच्या दाव्यावर आम्ही व्यक्त व्हावं असं आपल्याला वाटत नसल्याची प्रतिक्रिया ठाकरे शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी दिली आहे. वंचित बहुजन पार्टीच्या सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा खर्च हा भाजपाच्या कार्यालयातूनच होतो असं म्हणावं का असंही सुषमा अंधारे यांनी केली आहे.तर भाजपनेही हा दावा फेटाळून लावला आहे. देवेंद्र फडणवीस मातोश्रीवर जातील हा दावा हास्यास्पद असल्याचं भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी म्हटलं आहे.

## आज EPS 95 पेंशन संघर्ष समितीच्यावतीने

# आझाद मैदानात 'सरकारचे ध्यान आकर्षण धरणे'

■ मुंबई

EPS 95 पेंशनधारकांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने तातडीने मध्यस्थाची भूमिका पार पाडावी या करिता आज 1 ऑक्टोबर रोजी सकाळपासून आझाद मैदानावर EPS 95 पेंशनधारकांकडून ध्यान आकर्षण धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

पती पत्नी ला जीवन जगण्यासाठी किमान मासिक पेंशन रू 7500/- व त्याला महागाई भत्ता, सुप्रीम कोर्टाचे निर्णयानुसार पेन्शनर मध्ये कोणताही भेदभाव न करता वास्तविक वेतनावर अंशदान घेऊन उच्च पेंशन, वृद्धापकाळात मोफत वैद्यकीय सुविधा.,या योजने पासून वंचित ठेवलेल्या कामगारांचा समावेश करुन त्यांना किमान मासिक रु 5000/- रुपये द्या. या प्रमुख मागण्या आहेत.या कामगारांनी दरमहा रु 417/-,541/-, 1250/- अंशदान पेंशन फंडात दिले आहे आणि देश निर्मिती मध्ये ऐन तारुण्यातील 30/35 वर्ष खर्ची घातले, आपले रक्त घाम गाळून देश समृद्ध बनविण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली त्यांना आज सरासरी पेंशन रु 1171/-.. कितीही महागाई वाढली तरी त्यात कवडीची हि वाढ होत नाही. त्यामुळे EPS पेंशनर्स दयनीय व मरणासन्न अवस्थेत जीवन जगत आहेत. सन्मानजनक पेंशन व वैद्यकीय सुविधा अभावी अनेक पेंशनधारक मरत आहेत. त्यामुळे आज जरी देशाची प्रगती होत असली तरी EPS पेंशनधारकांची अधोगती होत आहे. ज्यांनी पेंशन फंडात अंशदान दिलेले नाही त्यांच्यासाठी सरकारच्या विविध सन्मान योजना आहेत मात्र ज्यांनी पूर्ण सेवा काळात दरमहा अंशदान दिले त्यांना तुटपुंजी पेंशन? हे सावत्र व्यवहार का? असा सवाल संघर्ष समितीने केला आहे.


सिडको शहरांचे शिल्पकार

## बोली मागविणारी सूचना

**बोली मागविणारी सूचना (२ री मागणी)**
**२ वर्षांसाठी खारघर सेक्टर ३६ मधील सिडकोचे विश्रांती गृह आणि सीबीडी बेलापूर येथील पंचशील बंगल्यामधील उद्यानांची व्यापक देखभाल. (२ री मागणी)**

महाराष्ट्रची सिडको लिमिटेड ई-निविदाकरण प्रक्रियेद्वारे "ऑन लाईन" नग दर शतमान बोली खाली नमूद कामासाठी अनिवार्य पात्रता निकषांची पूर्तता करणारे अनुभवी प्रस्तावित बोलीदार ज्यांनी सरकारी संस्था/ सरकारी उपक्रम/ कॉर्पोरेट कार्यालयांच्या व्हीआयपी गेस्ट हाऊसच्या लँडस्केप/ गार्डनसारख्या आणि तस्तम स्वरूपाची कामे पूर्ण केली आहेत त्यांच्याकडून मागवित आहेत:

१. कामाचे नाव: २ वर्षांसाठी खारघर सेक्टर ३६ मधील सिडकोचे विश्रांती गृह आणि सीबीडी बेलापूर येथील पंचशील बंगल्यामधील उद्यानांची व्यापक देखभाल. (२ री मागणी) २. सी. ए. क्र.: ०२/ सिडको/ईई(एनएम)/२०२४-२५ ३. बोलीमध्ये भरायची रक्कम: रु. ४३,००,५३३.१८/- ४. इ.र.ठे.: रु. ४४,०००/- ५. पूर्तता कालावधी: ७३० (सातशे तीस) दिवस (पावसाळ्यासह) ६. निविदा प्रक्रिया शुल्क: रु. १,१८०.०० (१८% जीएसटीसह (ना-परतावा))

बोली कार्यक्रमासह बोली कागदपत्रे https://mahatender.gov.in संकेतस्थळावर ०३/१०/२०२४ रोजी १७.०१ वा. पासून उपलब्ध आहे.

**अधीक्षक अभियंता (एचक्यू)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२६०/२०२४-२५



**पश्चिम रेल्वे**

**ई-प्रापण निविदा सूचना क्र. एस/५५/२०२४ दि. २५.०९.२०२४**

| अनु. क्र. | बाबीचे संक्षिप्त वर्णन | परिमाण | टी. ओ. डी. |
|---|---|---|---|
| ६६५ | एलईडी सिग्नल लाईटिंग युनिट-रूट | १५१० नग | २३-ऑक्टो-२४ |
| ६६६ | जनरेटर कार करिता प्रायमरी स्प्रिंग आऊटर | ४८० नग | २४-ऑक्टो-२४ |
| ६६७ | एलएचबी एनएसी कोचेस करिता प्रायमरी स्प्रिंग आऊटर | ६१९ नग | २४-ऑक्टो-२४ |
| ६६८ | करोनरी नॉन कम्पलियंट बलून | ११०० नग | २४-ऑक्टो-२४ |
| ६६९ | आरएमपीयू करिता योग्य रेफ्रीजरेंट गॅस आर-४०७सी | १२४७१ केजी | २८-ऑक्टो-२४ |
| ६७० | ४८व्ही-२००एएच व्हीआरएलए बॅटरीज संच | ९७ संच | २८-ऑक्टो-२४ |
| ६७१ | एलईडी सिग्नल लाईटिंग युनिट-शंट | ९६३ नग | २८-ऑक्टो-२४ |
| ६७२ | लो मेंटन्स स्टेशनरी लिड | १६ संच | ०४-नोंव्हे-२४ |
| ६७३ | न्यूरोसर्जरी करिता ब्रेन एंडोस्कोपी सिस्टीम | २ नग | ०४-नोंव्हे-२४ |
| ६७४ | ३ फेज मेजरींग आणि मॉनिटरिंग रिले | १३०४ नग | ०६-नोंव्हे-२४ |
| ६७५ | साहित्य आणि सीएएमसीसह डायनॅमिक व्हिल बॅलन्सिंग मशीन | २ नग<br>१ संच | १८-नोंव्हे-२४ |

**शुद्धीपत्रक**

**निविदा सूचना क्र. एस-४१-२०२४ दि. ०२.०८.२०२४ मधील अनु. क्र.५४५ करिता देय दिनांक कृपया "३०.०९.२०२४" असा वाचावा.**

**निविदा सूचना क्र. एस-४१-२०२४ दि. ०२.०८.२०२४ मधील अनु. क्र.५४६ करिता देय दिनांक कृपया "३०.०९.२०२४" असा वाचावा.**

**तपशीलवार सूचना ईरठे, खरेदी बंधने आणि तपशिलवार निविदा अटींकरिता कृपया संकेतस्थळ www.ireps.gov.in आणि www.wr.indianrailways.gov.in ला भेट दया.** 0581

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा: x.com/WesternRly


पान ९ वरुन

## देशी गाय आता 'राज्यमाता - गोमाता'

ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा 8 हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे. तसेच माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा मराठा आरक्षणाबाबतचा दुसरा आणि तिसरा अहवाल राज्य सरकारने स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. 'प्राचीन काळापासून मानवाच्या दैनंदिन जीवनामध्ये गाईचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वैदिक काळापासून गाईचे धार्मिक, वैज्ञानिक व आर्थिक महत्त्व विचारात घेऊन त्यांना कामधेनू असे संबोधण्यात येते. राज्यातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या देशी जातींच्या गायी आढळतात. तथापि दिवसेंदिवस देशी गाईंच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर घट होत आहे', अशी चिंता या आदेशाच्या सुरुवातीलाच व्यक्त करण्यात आली आहे.


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सत्यमेव जयते

**ई-निविदा सूचना क्र. ४१ (दुसरा पुकार) सन २०२४-२५**

अंबरनाथ पाणी पुरवठा योजने अंतर्गत मासिक अंदाजे ३८००० पाणी बिल तयार करण्यासाठी सेवा प्रदान करणे. या सेवेमध्ये ऑनलाइन / ऑफलाइन फोटो मीटर रीडिंग, बिल प्रिंटिंग, बिल वितरण, बिलिंग विभागात डेटा एंट्री ऑपरेटर सेवा प्रदान करणे आणि अंबरनाथ, बदलापूर इत्यादी कॅश कलेक्शन केंद्रावर कर्मचारी पुरविणे या कामाची निविदा म.जी. प्रा. कडून मागविण्यात येत आहे. या कामाची अंदाजित किंमत रु. २,१६,६२,१२०/- (दोन कोटी सोळा लक्ष बासठ हजार एकशे वीस मात्र) आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. २६ / ०९ / २०२४ पासून www.mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

**ठिकाण - अंबरनाथ**
**दिनांक - २३/०९/२०२४.**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**म.जी.प्रा.ज.व्य.वि. अंबरनाथ**

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी३५८४



## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**

म्हाडा MHADA

## ई-निविदा सूचना

कार्यकारी अभियंता (पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी / एमईएस/मुंबई महानगरपालिका /सिडको रेल्वे बीपीटी / एमआयडीसी एम. जे. पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण १ कामांकरीता वी १ (Percantage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | ०१/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदापूर्व बैठक | ०४/१०/२०२४ दुपारी ३:३० वाजता |
| ३ | निविदा विक्री बंद | ०८/१०/२०२४ दुपारी ६:१५ वाजता | ४ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १०/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |
| ५ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | ११/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर | | | |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

CPRO/A/819

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (प).**
**मुं.म. सु. मंडळ, मुंबई**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us: @mhadaofficial



## बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहीर सूचना

खालील परिशिष्टामध्ये वर्णन करण्यात आलेल्या भायखळा विभागामधील ९२४ चौ. मी. यार्डस जे ७७२.५८ चौ. मी. शी समतुल्य आणि ३२.८९ चौ. मी. सर्व्हिस रोड असलेल्या प्लॉट क्र. १२२, आग्रीपाडा (पश्चिम) इस्टेट, धारण केलेला सी. एस. क्र. ३/१८६५ च्या संदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका च्या मालमत्ता नोंदीमध्ये भाडेपट्टेदार म्हणून नमूद १) नसीम मोहम्मद युसुफ २) मैमुना महोमद मारवाडी, ३) साबीरा अहमद मारवाडी, ४) फैमेदा अब्दुल माजीद आणि ५) हजराबाई मोहमद हुसेन ह्यांची नावे दाखविण्यात आली आहेत.

ज्याअर्थी, अर्जदार, अर्जदार हुसेनी ए. बूटवाला यांनी नसीम बानू युसुफ पटेल आणि अन्य ह्यांच्या वतीने सहाय्यक आयुक्त (संपदा) ह्यांना पाठवण्यात आलेले पत्र दिनांकित १६/१०/२०१७ मध्ये खालील संदर्भात असलेल्या विषयांकित प्लॉटच्या भाडेतत्वाचे नूतनीकरण करण्याची विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, पहिल्या भागाचे अभिहास्तांकन कर्ता असा संदर्भ असलेल्या १) नसीम मोहमद युसुफ, २) मैमुना महमूद मारवाडी, ३) सबिरा अहमद मारवाडी, ४) फैमेदा अब्दुल माजीद आणि ५) हजराबाई मोहमद हुसेन आणि दुसऱ्या भागाचे पुष्टी करणारे पक्षकार असा संदर्भ असलेले महोमद युसुफ मुसा आणि तिसऱ्या भागाचे अभिहस्तांकिती असा संदर्भ असलेले १) श्रीमती झेबुनिस्सा अब्दुल हमीद मर्चंट, २) महोमद अमीन अब्दुल हमीद मर्चंट, ३) महोमद आरिफ अब्दुल हमीद मर्चंट आणि ४) महोमद फिरोझ अब्दुल हमीद मर्चंट ह्यांच्या दरम्यान अभिहास्तांकन करार दि. ३१/०/१९९१ करण्यात आला होता.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अभिहास्तांकन करार दि. ३१/०/१९९१ मध्ये नमूद केलेल्या रकमेचा विचार करून, नियुक्त केलेल्यांनी नियुक्त केलेल्यांना दिलेली रक्कम, असाइनकर्ते त्याद्वारे समान भागांमध्ये कायमस्वरूपी अभिहास्तांकी ह्यांना प्रदान, विक्री, नियुक्त, जारी, संदेश आणि आश्वासन देतात आणि त्याद्वारे पुष्टी करणारे पक्ष करतात. अभिहास्तांकी ह्यांना त्यांची सर्व मालमत्ता, हक्क, शीर्षक, व्याज, दावा आणि मागणी आणि जमिनीचा किंवा जमिनीचा सर्व खंड आणि भूखंड आणि त्यावर उभ्या असलेल्या निवास गृह आणि राहत्या घरासह, प्लॉट नं. असलेल्या रेब्श स्ट्रीट येथे वसलेल्या बृमनपाच्या पश्चिम आग्रीपाडा इस्टेटच्या धारण केलेल्या प्लॉट क्र. १२२ आणि येथील खालील परिशिष्टामध्ये नमूद करण्यत आलेल्या याची पुष्टी केली आणि त्यात नमूद केलेल्या अटी व शर्तींचे वर्णन केले आहे. उपरोक्त अभिहास्तांकन करार दि. ३१/१०/१९९१ हा च्या अनुक्रमांक बीबीई/३३२८/१९९१ अंतर्गत संयुक्त उपनिबंधक, मुंबई शहर यांच्या कार्यालयात नोंदणीकृत आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त नुसार अनुक्रमांक बीबीई/३३२८/१९९१ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या अभिहास्तांकन करार दि. ३१/१०/१९९१ अनुसार खालील संदर्भात अल्सेल्या विषयांकित प्लॉटच्या संदर्भात नमूद १) नसीम मोहम्मद युसुफ २) मैमुना महोमद मारवाडी, ३) साबीरा अहमद मारवाडी, ४) फैमेदा अब्दुल माजीद आणि ५) हजराबाई मोहमद हुसेन ह्यांच्या भाडेपट्टा हक्कांच्या समान हिस्स्यासाठी (प्रत्येकी २५% हिस्सा) नमूद १) १) श्रीमती झेबुनिस्सा अब्दुल हमीद मर्चंट, २) महोमद अमीन अब्दुल हमीद मर्चंट, ३) महोमद आरिफ अब्दुल हमीद मर्चंट आणि ४) महोमद फिरोझ अब्दुल हमीद मर्चंट हे पात्र आहेत.

आणि ज्याअर्थी, अभिह्स्तांकन करार दि. ०३/१०/१९९२ ज्यामध्ये पहिल्या भागाचे अभिहस्तांकन कर्ते असा संदर्भ असलेले १) श्रीमती झेबुनिसा अब्दुल हमीद मर्चंट, २) मोहम्मद अमीन अब्दुल हमीद मर्चंट, ३) मोहम्मद आरिफ अब्दुल हमीद मर्चंट आणि ४) महोमद फिरोज अब्दुल हमीद मर्चंट, आणि १) श्री इस्माईल हशम मर्चंट , २) श्रीमान हुसैनी अहमदअली बूटवाला, ३) श्रीमती साराबाई सालेहभाई कचवाला, ४) श्री फजल मोहम्मद दिलावर शेख आणि ५) श्री युसुफभाई अलीमोहम्मद सुरा, ज्यांना इतर भागाचे "अभिहास्तांकीती" असा संदर्भ असलेले ह्यांच्या दरम्यान करण्यात आला आणि त्याची अंमलबजावणी करण्यात आली

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अभिहास्तांकन करार दि. ०३/१०/१९९२, त्यात नमूद केलेल्या रकमेचा विचार करून, नियुक्त केलेल्यांनी नियुक्त केलेल्यांना दिलेली रक्कम, असाइनकर्ते त्याद्वारे नियुक्त केलेल्यांना त्यांचे सर्व हक्क, शीर्षक, व्याज, दावा आणि त्यांची विक्री, हस्तांतरित, नियुक्त, जारी, संदेश आणि आश्वासन देतात. त्या मालमत्तेची मागणी आणि त्यावरील जमिनीचा किंवा जमिनीचा सर्व तुकडा किंवा पार्सल आणि त्यावर उभ्या असलेल्या संदेश आणि निवासी घरे, पडून राहणे आणि रेब्श स्ट्रीटवर असणे, बीएमसीच्या पश्चिम आग्रीपाडा इस्टेटचा प्लॉट क्रमांक १२२ आहे आणि अधिक विशेषतः वर्णन केले आहे. त्याखालील शेड्यूलमध्ये आणि त्यात नमूद केलेल्या अटी व शर्तींवर करण्यात आले आहे. उपरोक्त अभिहास्तांकन करार दि. ०३/१०/१९९२ हे अनुक्रमांक बीबीई/२४६/१९९२ अंतर्गत संयुक्त उपनिबंधक, मुंबई शहर यांच्या कार्यालयात नोंदणीकृत आहे.

वरील बाबी लक्षात घेऊन, विषयांकित प्लॉटच्या संदर्भात नमूद केलेल्या नोंदणीकृत अभिहास्तांकन करार दि. ०३/१०/१९९२ च्या अनुषंगाने क्रमांक बीबीई/२४६/१९९२ अंतर्गत नोंदणीकृत असलेले ज्यामध्ये नमूद करण्यात आल्या अनुसार १) श्रीमती. जेबुनिसा अब्दुल हमीद मर्चंट, २) मोहम्मद अमीन अब्दुल हमीद मर्चंट, ३) मोहम्मद आरिफ अब्दुल हमीद मर्चंट आणि ४) महोमद फिरोज अब्दुल हमीद मर्चंट यांच्या भाडेपट्टा हकांमधील नमूद १) श्री इस्माईल हाशम मर्चंट, २) श्री हुसैनी अहमदअली बूटवाला, ३) श्रीमती साराबाई सालेहभाई काचवाला, ४) श्री फजल मोहम्मद दिलावर शेख आणि ५) श्री युसुफभाई अलीमोहम्मद सुरा, एकत्रितपणे सांगितलेल्या लीजहोल्ड हक्कांच्या समान समभाग (प्रत्येकी २०% हिस्स्या) साठी हक्कदार आहेत.

आणि कारण, ते दुसऱ्या डीड ऑफ असाइनमेंटच्या नोटराइज्ड प्रत वरून पाहिले जाते. २८/१२/२०१६ श्री. फझल मोहम्मद दिलावर शेख यांनी आणि त्यांच्या दरम्यान अंमलात आणला, त्यात एका भागाचा "नियुक्तीकर्ता" आणि श्री जुनैद मोहम्मद सूर्या, ज्यांना त्यामध्ये दुसऱ्या भागाचे "अभिहास्तांकनकर्ता " म्हणून संबोधले गेले.

आणि कारण, उपरोक्त अभिहास्तांकन करार दि. २८/१२/२०१६, त्यामध्ये नमूद केलेल्या रकमेचा विचार करून, नियुक्त केलेल्या व्यक्तीने नियुक्त केलेल्या व्यक्तीला दिलेली रक्कम, नियुक्त केलेल्या व्यक्तीने त्याचे सर्व २०% अविभाजित वाटा, हक्क, शीर्षक, व्याज, दावा त्याद्वारे सूचित केले, नियुक्त केले आणि हस्तांतरित केले. आणि त्या मालमत्तेची मागणी आणि त्यावरील जमिनीचा किंवा जमिनीचा सर्व तुकडा किंवा पार्सल आणि त्यावर उभ्या असलेल्या मेसेजेस आणि राहत्या घरासह, पडलेले आणि रेब्श स्ट्रीटवर, बीएमसीच्या पश्चिम आग्रीपाडा इस्टेटच्या प्लॉट क्रमांक १२२ वर आणि विशेषत: त्याखालील परिशिष्टामध्ये देण्यात आलेल्या आणि त्यात नमूद केलेल्या अटी व शर्तींचे वर्णन केले आहे. उपरोक्त अभिहास्तांकन कारर दि. २८/१२/२०१६ च्या अनुक्रमांक बीबीई-२/१३७१८/२०१६ अंतर्गत संयुक्त उपनिबंधक, मुंबई शहर यांच्या कार्यालयात नोंदणीकृत आहे.

आणि कारण, वरील बाबी लक्षात घेऊन, नमूद केलेल्या असाइनमेंटच्या नोंदणीकृत डीडच्या अनुषंगाने दि. २८/१२/२०१६ च्या क्रमांक बीबीई-२/१३७१८/२०१६ अंतर्गत नोंदणीकृत, श्री जुनैद मोहम्मद सूर्या, विषय प्लॉटच्या संदर्भात, श्री फजल मोहम्मद दिलावर शेख यांच्या २०% अविभाजित लीजहोल्ड हक्कांसाठी पात्र आहेत.

आणि जेथे, उक्त युसुफभाई अलजमोहम्मद सुरा यांचे कौटुंबिक वृक्ष, ज्यामध्ये असे दिसते की, उक्त युसुफभाई अलीमोहम्मद सुरा यांचे २१/०७/१९९९ रोजी निधन झाले असून १) श्रीमती नर्गिस युसूफ सुरा (विधवा), २) श्रीमती सालेहा इस्माईल बलवा (विवाहित मुलगी), ३) श्रीमती सबिना फरीद कराडिया (विवाहित मुलगी), ४) श्रीमती रेहाना रिझवान काडीवाल (विवाहित मुलगी), ५) श्रीमती फरजाना इम्रान सुरा आणि ६) श्री रिजवान युसूफ सुरा (मुलगा) हयात असलेले कायदेशीर वारस आहेत.

आणि ज्याअर्थी, युसुफभाई अलीमोहम्मद सुरा यांच्या निधनानंतर, त्यांचे हयात असलेले कायदेशीर वारस १) श्रीमती नर्गिस युसुफ सुरा (विधवा), २) श्रीमती सालेहा इस्माईल बलवा (विवाहित मुलगी), ३) सौ. सबिना फरीद कराडिया (विवाहित मुलगी), ४) श्रीमती रेहाना रिझवान काडीवाल (विवाहित मुलगी), ५) श्रीमती फरजाना इम्रान सुरा आणि ६) श्री. रिझवान युसूफ सुरा (मुलगा) हे मृत व्यक्तीच्या २०% अविभाजित वाट्यासाठी एकत्रितपणे हक्कदार आहेत.

आणि कारण, इन्स्ट्रमेंट ऑफ रिलीज दि. ०४/०९/१९९९ द्वारे आणि दरम्यान अंमलात आणले १) युसुफ सुरा यांच्या श्रीमती नर्गिस (विधवा), २) इस्माईल बलवा यांच्या श्रीमती सालेहा (पत्नी) आणि युसूफ सुरा यांची (मुलगी), ३) फरीद कराडिया यांची पत्नी श्रीमती सबिना आणि युसूफ सुरा यांची (मुलगी), ४) श्रीमती रेहाना रिजवान काडीवाल यांची पत्नी आणि युसूफ सुरा यांची मुलगी, ५) इम्रान सुराची पत्नी श्रीमती फरजाना आणि युसूफ सुरा यांची मुलगी, यामध्ये एकत्रितपणे एका भागाचे "रिलीझर्स" म्हणून संबोधले जाते आणि युसूफ सुरा यांचा मुलगा श्री. रिझवान , त्यात इतर भागाचा "रिलीझ" म्हणून संदर्भित. विमोचनकर्ते आणि विमोचन करणारे मृत युसूफ अलीमोहम्मद सुरा यांचे वंशज आहेत आणि संबंधित लीजहोल्ड मालमत्तेमध्ये सांगितलेल्या मृत व्यक्तीच्या २०% अविभाजित लीजहोल्ड अधिकारांचे एकत्रितपणे हक्क आहेत.

आणि कारण, रिलीझच्या उक्त साधनाद्वारे दि.०४/०९/१९९९, बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट, १९५८ च्या अनुसूची I च्या कलम ५२ च्या अर्थामध्ये रिलीझचे एक साधन असल्याने, मुद्रांक शुल्क रु. १००/- रिलीझच्या उक्त इन्स्टुमेंटवर आणि विमोचनकर्त्यांच्या बाजूने दिलेले २०% अविभाजित वाटा, हक्क, शीर्षक आणि व्याज त्याद्वारे सोडले आणि त्याद्वारे प्रत्येकाने आपला हिस्सा सोडला. ही स्थावर मालमत्ता पश्चिम आग्रीपाडा इस्टेट आणि भायखळा विभागाच्या कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ३/१८६५ मध्ये पडून आहे आणि त्यावर उभी असलेली रचना आणि विशेषत: त्याखालील लेखी आणि त्यात नमूद केलेल्या अटी व शर्तींमध्ये वर्णन केलेले आहे. सदर इन्स्टुमेंट ऑफ रिलीझ हे १९९९ मधील अनु. क्र. बीबीई/४२२१ अंतर्गत सब रजिस्ट्रार ऑफ ॲश्युरन्स, मुंबई यांच्या कार्यालयात नोंदणीकृत आहे.

आणि ज्याअर्थी, वरील बाबी लक्षात घेऊन, त्या नोंदणीकृत रिलीझच्या साधनाच्या अनुषंगाने दि. ०४/०९/१९९९ अनुसार क्रमांक बीबीई/४२२१/१९९९ अन्वये नोंदणीकृत, युसुफ सुरा यांचा मुलगा श्री रिजवान हे संबंधित अविभाजित शेअर्ससाठी पात्र आहेत १) युसूफ सुरा यांच्या श्रीमती नर्गिस विधवा, २) श्रीमती सालेहा यांच्या पत्नी इस्माईल बलवा आणि युसूफ सुरा यांची मुलगी, ३) फरीद कराडिया यांची पत्नी श्रीमती सबिना आणि युसूफ सुरा यांची मुलगी, ४) रिजवान काडीवाल यांची पत्नी श्रीमती रेहाना आणि युसूफ सुरा यांची मुलगी, ५) इम्रान सुरा यांची पत्नी श्रीमती फरजाना आणि त्यांची मुलगी. युसुफ सुरा आणि म्हणून संदर्भाखालील विषयाच्या प्लॉटच्या संदर्भात २०% हिस्सा, हक्क, शीर्षक, व्याज मिळण्यास एकत्रितपणे हक्क आहे.

आणि कारण, अर्जदार श्री. इस्माईल हाशम मर्चंट आणि इतरांनी केलेल्या अर्जावर बृहन्मुंबई महानगरपालिका (बृमनपा) आता प्रथम उल्लेख केलेल्यांची नावे नोंदवण्याचा मानस आहे १) श्रीमती. झेबुनिसा अब्दुल हमीद मर्चंट, २) महोमद अमीन अब्दुल हमीद मर्चंट, ३) महोमद आरिफ अब्दुल हमीद मर्चंट आणि ४) महोमद फिरोज अब्दुल हमीद मर्चंट समान समभागांसाठी म्हणजेच सांगितलेल्या जागी प्रत्येकी २५% हिस्सा १) नसीम मोहम्मद युसूफ, २) मैमुना महमूद मारवाडी, ३) साबिरा अहमद मारवाडी, ४) फईमेदा अब्दुल मजीद आणि ५) हजराबाई मोहम्मद हुसेन, या नोंदणीकृत असाइनमेंट डीड दि. ३१/१०/१९९१ क्रमांक बीबीई/३३२८/१९९१ अंतर्गत नोंदणीकृत आहे

आणि ज्याअर्थी, १) श्रीमान इस्माईल हाशम मर्चंट, २) श्रीमान हुसैनी अहमदअली बूटवाला, ३) श्रीमती साराबाई सालेहभाई कचवाला, ४) श्री फजल मोहम्मद दिलावर शेख आणि ५) श्री युसुफभाई अलीमोहम्मद सुरा यांची नावे नोंदवावीत. समान समभागांसाठी म्हणजेच सांगितलेल्या ऐवजी प्रत्येकी २०% वाटा १) श्रीमती. झेबुनिसा अब्दुल हमीद मर्चंट, २) महोमद अमीन अब्दुल हमीद मर्चंट, ३) महोमद आरिफ अब्दुल हमीद मर्चंट आणि ४) महोमद फिरोज अब्दुल हमीद मर्चंट, नमूद केलेल्या असाइनमेंट डीड दि. ०३/१०/१९९२ च्या क्रमांक बीबीई/२४६/१९९२ अंतर्गत नोंदणीकृत आहे

आणि त्यानंतर, उक्त श्री. फजल मोहम्मद दिलावर शेख यांचे नाव हटवणे आणि त्यांचा संबंधित २०% अविभाजित हिस्सा उक्त श्री जुनैद मोहम्मद सूर्या यांच्या नावावर हस्तांतरित करणे, नमूद केलेल्या असाइनमेंटच्या नोंदणीकृत डीड दि. २८/१२/२०१६ नुसार च्या क्रमांक बीबीई-२/१३७१८/२०१६ अंतर्गत नोंदणीकृत आहे.

आणि त्यानंतर, मृतक श्री युसूफभाई अलीमोहम्मद सुरा यांचे नाव हटवणे आणि त्यांच्या हयात असलेल्या कायदेशीर वारसांच्या नावे त्यांचा संबंधित २०% अविभाजित हिस्सा हस्तांतरित करणे १) श्रीमती नर्गिस युसूफ सुरा (विधवा), २) श्रीमती सालेहा इस्माईल बलवा (विवाहित मुलगी), ३) श्रीमती सबिना फरीद कराडिया (विवाहित मुलगी), ४) श्रीमती रेहाना रिझवान काडीवाल (विवाहित मुलगी), ५) श्रीमती फरजाना इम्रान सुरा आणि ६) श्री रिजवान युसूफ सुरा (मुलगा);

आणि त्यानंतर, १) सौ. नर्गिस युसूफ सुरा, २) सौ. सालेहा इस्माईल बलवा, ३) सौ. सबिना फरीद कराडिया, ४) सौ. रेहाना रिझवान काडीवाल, ५) सौ. फरजाना इम्रान सुरा आणि ६) सौ. त्या मृत श्रीयुत युसुफभाई अलीमोहम्मद सुरा यांच्या २०% लीजहोल्ड अधिकारांमध्ये त्यांचे संबंधित अविभाजित शेअर्स श्री. रिझवान युसूफ सुरा यांच्या नावावर वितरीत केलेल्या नोंदणीकृत इन्स्ट्रुमेंट दि. ०४/०९/१९९९ च्या क्रमांक बीबीई/४२२२१/१९९९ अंतर्गत नोंदणीकृत आहे.

आणि म्हणूनच, भाडेपट्टा शेवटी १) श्री. इस्माईल हाशम मर्चंट, २) श्री. हुसैनी अहमदअली बूटवाला, ३) श्रीमती साराबाई सालेहभाई काचवाला, ४) श्री जुनैद मोहम्मद सूर्या आणि 5) श्रीमान यांच्या नावे दिला जाईल. बीएमसीच्या इस्टेट रेकॉर्डवरील आग्रीपाडा (पश्चिम) इस्टेटचा प्लॉट क्रमांक १२२ असलेल्या विषय लीजहोल्ड मालमत्तेच्या संदर्भात रिझवान युसूफ सुरा समान समभागांसाठी म्हणजेच प्रत्येकी २०% हिस्सा आहे.

कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्ती ज्यांचा उपरोक्त मालमत्तेवर कोणताही दावा आहे किंवा ज्यांची नावे प्रथम नोंदवण्यास हरकत आहे १) श्रीमती. झेबुनिसा अब्दुल हमीद मर्चंट, २) महोमद अमीन अब्दुल हमीद मर्चंट, ३) महोमद आरिफ अब्दुल हमीद मर्चंट आणि ४) महोमद फिरोज अब्दुल हमीद मर्चंट समान समभागांसाठी म्हणजेच सांगितलेल्या जागी प्रत्येकी 25% शेअर १) नसीम मोहम्मद युसूफ, २) मैमुना महमूद मारवाडी, ३) साबिरा अहमद मारवाडी, ४) फईमेदा अब्दुल मजीद आणि ५) हजराबाई मोहम्मद हुसेन, या नोंदणीकृत असाइनमेंट डीड नुसार दि. ३१/१०/१९९१ च्या क्रमांक बीबीई/३३२८/१९९१ अंतर्गत नोंदणीकृत आहे.

आणि त्यानंतर, १) श्रीमान इस्माईल हाशम मर्चंट, २) श्रीमान हुसैनी अहमदअली बूटवाला, ३) श्रीमती साराबाई सालेहभाई कचवाला, ४) श्री फजल मोहम्मद दिलावर शेख आणि ५) श्री युसुफभाई अलीमोहम्मद सुरा यांची नावे नोंदवावीत. समान समभागांसाठी म्हणजेच सांगितलेल्या ऐवजी प्रत्येकी २०% वाटा १) श्रीमती. झेबुनिसा अब्दुल हमीद मर्चंट, 2) महोमद अमीन अब्दुल हमीद मर्चंट, ३) महोमद आरिफ अब्दुल हमीद मर्चंट आणि ४) महोमद फिरोज अब्दुल हमीद मर्चंट, नमूद केलेल्या असाइनमेंट डीडच्या अनुषंगाने दि. ०३/१०/१९९२ च्या क्रमांक बीबीई/२४६/१९९२ अंतर्गत नोंदणीकृत आहे.

आणि त्यानंतर, उक्त श्री. फजल मोहम्मद दिलावर शेख यांचे नाव हटवणे आणि त्यांचा संबंधित २०% अविभाजित हिस्सा उक्त श्री जुनैद मोहम्मद सूर्या यांच्या नावावर हस्तांतरित करणे, नमूद केलेल्या असाइनमेंटच्या नोंदणीकृत डीडनुसार दि. २८/१२/२०१६ च्या क्रमांक बीबीई-२/१३७१८/२०१६ अंतर्गत नोंदणीकृत आहे.

आणि त्यानंतर, मृतक श्री युसूफभाई अलीमोहम्मद सुरा यांचे नाव हटवणे आणि त्यांच्या हयात असलेल्या कायदेशीर वारसांच्या नावे त्यांचा संबंधित 20% अविभाजित हिस्सा हस्तांतरित करणे १) श्रीमती नर्गिस युसूफ सुरा (विधवा), २) श्रीमती सालेहा इस्माईल बलवा (विवाहित मुलगी), ३) श्रीमती सबिना फरीद कराडिया (विवाहित मुलगी), ४) श्रीमती रेहाना रिझवान काडीवाल (विवाहित मुलगी), ५) श्रीमती फरजाना इम्रान सुरा आणि ६) श्री रिजवान युसूफ सुरा (मुलगा) हे कायदेशीर वारस आहेत.

आणि त्यानंतर, १) सौ. नर्गिस युसूफ सुरा, २) सौ. सालेहा इस्माईल बलवा, ३) सौ. सबिना फरीद कराडिया, ४) सौ. रेहाना रिझवान काडीवाल आणि ५) सौ. फरजाना इम्रान सुरा आणि ५) सौ. त्या मृत श्रीयुत युसुफभाई अलीमोहम्मद सुरा यांच्या २०% लीजहोल्ड अधिकारांमध्ये त्यांचे संबंधित अविभाजित शेअर्स श्री. रिझवान युसूफ सुरा यांच्या नावावर वितरीत केलेल्या नोंदणीकृत इन्स्टुमेंट दि. ०४/०९/१९९९ च्या क्रमांक बीबीई/४२२१/१९९९ अंतर्गत नोंदणीकृत;

आणि म्हणूनच, भाडेपट्टा शेवटी १) श्री. इस्माईल हाशम मर्चंट, २) श्री. हुसैनी अहमदअली बूटवाला, ३) श्रीमती साराबाई सालेहभाई काचवाला, ४) श्री जुनैद मोहम्मद सूर्या आणि 5) श्रीमान यांच्या नावे दिला जाईल. रिजवान युसूफ सुरा, बीएमसीच्या इस्टेट रेकॉर्डवरील आग्रीपाडा (पश्चिम) इस्टेटच्या प्लॉट नं. १२२, त्या संदर्भात प्रत्येकी २०% वाटा ज्याचे कार्यालय विधी विभाग, महानगरपालिका मुख्यालय, तिसरा मजला, हॉल नं. ३११, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१ येथे असून त्याना लेखी स्वरूपात कळवावे.

येथे आवश्यकतेनुसार कोणताही दावा किंवा आक्षेप न घेतल्यास, महानगरपालिका प्रथम १) श्रीमती. झेबुनिसा अब्दुल हमीद मर्चंट, २) महोमद अमीन अब्दुल हमीद मर्चंट, ३) महोमद आरिफ अब्दुल हमीद मर्चंट आणि ४) महोमद फिरोज अब्दुल हमीद मर्चंट समान समभागांसाठी म्हणजेच सांगितलेल्या जागी प्रत्येकी 25% शेअर १) नसीम मोहम्मद युसूफ, २) मैमुना महमूद मारवाडी, ३) साबिरा अहमद मारवाडी, ४) फईमेदा अब्दुल मजीद आणि ५) हजराबाई मोहम्मद हुसेन, या नोंदणीकृत असाइनमेंट डीड नुसार दि. ३१/१०/१९९१ च्या क्रमांक बीबीई/३३२८/१९९९१ अंतर्गत नोंदणीकृत आहे.

आणि त्यानंतर, १) श्रीमान इस्माईल हाशम मर्चंट, २) श्रीमान हुसैनी अहमदअली बूटवाला, 3) श्रीमती साराबाई सालेहभाई कचवाला, ४) श्री फजल मोहम्मद दिलावर शेख आणि ३) श्री युसुफभाई अलीमोहम्मद सुरा यांची नावे नोंदवावीत. समान समभागांसाठी म्हणजेच सांगितलेल्या ऐवजी प्रत्येकी २०% वाटा १) श्रीमती. झेबुनिसा अब्दुल हमीद मर्चंट, २) महोमद अमीन अब्दुल हमीद मर्चंट, ३) महोमद आरिफ अब्दुल हमीद मर्चंट आणि ४) महोमद फिरोज अब्दुल हमीद मर्चंट, नमूद केलेल्या असाइनमेंट डीडच्या अनुषंगाने दि. ०३/१०/१९९२ च्या क्रमांक बीबीई/२४६/१९९२ अंतर्गत नोंदणीकृत आहे.

आणि त्यानंतर, उक्त श्री. फजल मोहम्मद दिलावर शेख यांचे नाव हटवणे आणि त्यांचा संबंधित २०% अविभाजित हिस्सा उक्त श्री जुनैद मोहम्मद सूर्या यांच्या नावावर हस्तांतरित करणे, नमूद केलेल्या असाइनमेंटच्या नोंदणीकृत डीडनुसार. २८/१२/२०१६ च्या क्रमांक बीबीई-२/१३७१८/२०१६ अंतर्गत नोंदणीकृत आहे.

आणि त्यानंतर, मृतक श्री युसूफभाई अलीमोहम्मद सुरा यांचे नाव हटवणे आणि त्यांच्या हयात असलेल्या कायदेशीर वारसांच्या नावे त्यांचा संबंधित २०% अविभाजित हिस्सा हस्तांतरित करणे १) श्रीमती नर्गिस युसूफ सुरा (विधवा), २) श्रीमती सालेहा इस्माईल बलवा ( विवाहित मुलगी), ३) श्रीमती सबिना फरीद कराडिया (विवाहित मुलगी), ४) श्रीमती रेहाना रिझवान काडीवाल (विवाहित मुलगी), ५) श्रीमती फरजाना इम्रान सुरा आणि ६) श्री रिजवान युसूफ सुरा (मुलगा);

आणि त्यानंतर, १) सौ. नर्गिस युसूफ सुरा, २) सौ. सालेहा इस्माईल बलवा, ३) सौ. सबिना फरीद कराडिया, ४) सौ. रेहाना रिझवान काडीवाल आणि ५) सौ. फरजाना इम्रान सुरा आणि ५) सौ. त्या मृत श्रीयुत युसुफभाई अलीमोहम्मद सुरा यांच्या २०% लीजहोल्ड अधिकारांमध्ये त्यांचे संबंधित अविभाजित शेअर्स श्री. रिझवान युसूफ सुरा यांच्या नावावर वितरीत केलेल्या नोंदणीकृत इन्स्ट्रुमेंट दि. ०४/०९/१९९९ च्या क्रमांक बीबीई/४२२२१/१९९९ अंतर्गत नोंदणीकृत असलेले

आणि म्हणूनच, भाडेपट्टा शेवटी १) श्री. इस्माईल हाशम मर्चंट, २) श्री. हुसैनी अहमदअली बूटवाला, ३) श्रीमती साराबाई सालेहभाई काचवाला, ४) श्री जुनैद मोहम्मद सूर्या आणि ५) श्रीमान यांच्या नावे दिला जाईल. रिजवान युसूफ सुरा, बीएमसीच्या इस्टेट रेकॉर्डवरील आग्रीपाडा (पश्चिम) इस्टेटच्या प्लॉट क्रमांक १२२ असलेल्या विषयाच्या भाडेपट्टीच्या मालमत्तेसाठी प्रत्येकी २०% वाटा, अशा कोणत्याही कथित दाव्याच्या संदर्भाशिवाय किंवा कॉर्पोरेशनवर बंधनकारक नसलेले व्याज जे सर्व हेतू आणि हेतूंसाठी माफ केले गेले आहे असे मानले जाईल.

**उपरोक्त संदर्भात परिशिष्ट**

नोंदणीकरण जिल्हा आणि मुंबई शहर आणि मुंबई उपनगरच्या उप जिल्ह्यामधील भायखळा विभागामधील ९२४ चौ. मी. यार्डस जे ७७२.५८ चौ. मी. मोजामापा शी समतुल्य आणि रोड/ पसेज च्या ३२.८९ चौ. मी. असलेल्या जमिनीचा धारण केलेला प्लॉट क्र. १२२, आग्रीपाडा (पश्चिम) इस्टेट, धारण केलेला सी.एस. क्र. /१८६५ असलेल्या भाडेपट्ट्यावरील जमिनीचा सर्व खंड आणि भूखंड. आणि त्याच्या सीमा पुढील प्रमाणे

| | |
|---|---|
| दक्षिण पूर्व दिशेला किंवा त्या बाजूकडे | : सर्व्हिस पसेज |
| दक्षिण पश्चिम दिशेला किंवा त्या बाजूकडे | : प्लॉट क्र. १२१ |
| उत्तर पश्चिम दिशेला किंवा त्या बाजूकडे | : रेबेसच स्ट्रीट |
| उत्तर पूर्व दिशेला किंवा त्या बाजूकडे | : प्लॉट क्र. १२३ |

**हे ३० सप्टेंबर २०२४ रोजी दिनांकित.**

पीआरओ/१४५०/जाही/२०२४-२५

**सही/-**
**वकील सुनील सोनावणे**
**वकील आणि विधी अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका करीता**

**रस्त्यावरचे उघड्यावरील अन्न पदार्थ, कापलेली फळे व पेय यांचे सेवन करू नये.**

तुम्ही जर तुमच्या जवळच्या गोष्टींबद्दल समाधानी नसाल तर भविष्यात मिळणाऱ्या गोष्टींबद्दल देखील तुम्ही समाधानी नसाल.



- सॉक्रेटीस
ग्रीक विचारवंत

वृत्तमानस
मुंबई, मंगळवार, १ ऑक्टोबर २०२४

# सोयाबीनची सोय होईना...

भारताच्या अर्थकारणाचा आणि विकासाचा कणा शेतीला मानले जाते. शेती व्यवसाय हा भारताचा प्रमुख व्यवसाय शेती असल्याने भारताला कृषीप्रधान देश देखील म्हटले जाते. अनेक औद्योगिक व्यवसाय शेतीला जोडलेले आहेत. त्यामुळे भारताचा विकास वाढवायचा असेल तर शेती व्यवसायाला अधिक महत्त्व द्यावे लागणार आहे. शेती व्यवसायाला महत्त्व द्यायचं असेल तर इथला शेतकरी सक्षम आणि नव्या तंत्रज्ञानाचा पाईक झाला पाहिजे. तंत्रज्ञान त्याच्यापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी शासनाची आहे. त्या जबाबदारी त कोणताही कसूर होता कामा नये. मागील काही वर्षांपासून शेतकरी व कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे अर्थकारण बिघडले असून, त्यात कायम भरच पडत चालली आहे. गेल्या हंगामात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील सोयाबीनची मागणी आणि सोयाबीन तेलाचे वाढलेले भाव या पार्श्वभूमीवर सोयाबीन दराचा उच्चांक पाहायला मिळाला होता. काही ठिकाणी सोयाबीनला नऊ हजार रुपये प्रतिक्विंटलपर्यंत दर मिळाला होता. त्यामुळे या वेळी शेतकऱ्यांच्या अपेक्षा खरोखरच वाढल्या होत्या, पण गेल्या वर्षीही दर अपेक्षेपेक्षा कमी राहिले. खाद्य तेलाच्या वाढत्या आयातीमुळे सोयाबीनचे दर दबावात आहेत, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. गेल्या वर्षी देशातील सोयाबीनचे उत्पादन घटूनही बाजारात अपेक्षित दर मिळू शकले नाहीत. आता नवीन सोयाबीन बाजारात आल्यावर काय चित्र राहील, याची चिंता शेतकऱ्यांना भेडसावत आहे. सध्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सोयाबीनला सरासरी ४ हजार २०० ते ४ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत दरात किंचित वाढ दिसत असली तरी वर्षभरापासून किमतीतील उतरता कल अजूनही कायम आहे. सोयाबीनचा हमीभाव पावणेपाच हजार रुपये प्रतिक्विंटल आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सोयाबीनला साडेचार हजार रुपयांपर्यंत दर मिळाले होते. त्यानंतर एक महिना किंमत वाढत ५ हजार ३०० रुपयांपर्यंत पोहोचली, मात्र त्यानंतर सातत्याने घसरण आहे. यंदाच्या खरीप हंगामातील नवीन सोयाबीन बाजारात येण्यास वेळ असला तरी बाजारात सोयाबीन दरातील घसरण चिंताजनक मानली जाते. राज्यात सोयाबीन लागवडीचे सरासरी क्षेत्र ४१.५० लाख हेक्टर असून, यंदा खरीप हंगामात ५१.१७ लाख हेक्टर क्षेत्रात सोयाबीनची लागवड करण्यात आली आहे. गेल्या हंगामाच्या तुलनेत सोयाबीनचे क्षेत्र वाढले आहे. गेल्या हंगामात राज्यात ५०.८५ लाख हेक्टरमध्ये सोयाबीनची लागवड करण्यात आली होती. गेल्या अडीच दशकांत सोयाबीनचे क्षेत्र तब्बल पाच पटीने वाढले, पण सोयाबीनला दर नाही अशी विचित्र अवस्था आहे. विदर्भ आणि मराठवाडा विभागात सोयाबीनचे क्षेत्र सर्वाधिक आहे. बहुतांश शेती कोरडवाहू आहे. गेल्या वर्षी आंतरराष्ट्रीय घडामोडी व अन्य कारणांमुळे झालेल्या शेतमालाच्या किमतीतील घसरणीमुळे शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागले होते. त्यांना दिलासा देण्यासाठी खरीप पणन हंगामामध्ये सोयाबीन आणि कापूस उत्पादकांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रतिहेक्टरी पाच हजार रुपयांचे अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेऊन शेतकऱ्याला आधार देण्याचा चांगला प्रयत्न केला, पण नवीन सोयाबीन बाजारात येण्याआधी दर घसरणीला लागले. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. त्यामुळे सोयाबीनचे भाव वाढविण्यासाठी केंद्र सरकारने खाद्यातेल आयात शुल्कात २० टक्क्यांची वाढ केली. आता कच्चे सोयातेल, पामतेल आणि सूर्यफुल तेल आयातीवर २७.५ टक्के आयात शुल्क लागू झाले आहे. त्यामुळे बाजारात दरांमध्ये सुधारणा झाली. पण तरीही सोयाबीनचे दर हमीभावापेक्षा कमी असल्याने नेमके करायचे अशा द्विधा अवस्थेत बळीराजा आहे. देशातील एकूण सोयाबीनच्या उत्पादनांपैकी महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशमध्ये ८० टक्के उत्पादन होते. यंदा सुमारे १३१ लाख टन सोयाबीन उत्पादनाची आकडेवारी समोर आली आहे. जागतिक पातळीवर सोयाबीनच्या उत्पादनात भारताचा पाचवा क्रमांक आहे. ब्राझीलमध्ये सर्वाधिक सोयाबीनचे उत्पादन घेतले जाते. त्याखालोखाल अमेरिका, अर्जेंटिना आणि चीनचा क्रमांक आहे. जागतिक पातळीवर सोयाबीनची हेक्टरी सरासरी उत्पादकता २ हजार ६७० किलो इतकी असताना देशातील उत्पादकता मात्र केवळ १ हजार ५१ किलो आहे. महाराष्ट्रातील गेल्या हंगामातील उत्पादकता ही दोन हजार रुपये किलो आहे. ब्राझील देशात एका हेक्टरमध्ये साधारणपणे ३ हजार २०० किलो उत्पादन घेतले जात असताना आपल्या देशात उत्पादकता फारच कमी आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात दर कोसळल्यास त्याचे परिणाम देशातील बाजारात मोठ्या प्रमाणात जाणवतात आणि त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागते. गेल्या तीन दशकांमध्ये देशात सोयाबीनचे क्षेत्र झपाट्याने वाढले असताना उत्पादकता वाढविण्याकडे मात्र लक्ष पुरविण्यात आले नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृषी विभागाच्या अहवालानुसार राज्यात सोयाबीनचे गेल्या पाच वर्षांतील लागवडीखालील सरासरी क्षेत्र ४२ लाख हेक्टर इतके आहे. गेल्या वर्षी ५०.८५ लाख हेक्टरमध्ये सोयाबीन लागवड झाली. यंदाच्या खरीप हंगामात राज्यात सोयाबीन लागवडीखालील क्षेत्र ५१.५२ लाख हेक्टर आहे. सध्या सोयाबीन पिकावर अनेक कीड रोगांचा प्रादुर्भाव आढळतो आहे. काढणीच्या अवस्थेत असलेल्या सोयाबीनचे परतीच्या पावसाने नुकसान होण्याची शक्यता असल्याने हे दुहेरी संकट उभे ठाकले आहे. सोयाबीनचा बाजारभाव हा प्रामुख्याने सोयापेंडच्या भावावर अवलंबून असतो. सोयाबीनवरील प्रक्रियेनंतर सुमारे ८० टक्के सोयापेंड तर २० टक्के तेल मिळते. देशांतर्गत मागणीसह सोयापेंड निर्यात हा सोयाबीनचा बाजारभाव ठरवणारा महत्त्वाचा घटक आहे. सोयापेंड निर्यातीत गेल्या दहा वर्षांमध्ये मोठी घट झाल्याचे दिसून आले आहे. यासाठी सरकारचे आयात-निर्यातीचे धरसोडीचे धोरण कारणीभूत आहे. दुसरीकडे खाद्यातेलाबाबत आत्मनिर्भर होण्याबाबतची सरकारची घोषणा अजूनही हवेतच आहे. सोयाबीनचे भाव सोयापेंड आणि सोयातेलावर अवलंबून असतात. केंद्र सरकारने गेल्या वर्षी देशांतर्गत बाजारपेठेत खाद्यातेलाच्या किमती नियंत्रित आणि कमी करण्यासाठी खाद्यातेलावरील आयात शुल्क कमी केले होते. त्यामुळे देशात खाद्यातेलाची विक्रमी आयात तर झाली, पण सोयाबीनचे देशांतर्गत भाव कमी झाले. सोयाबीनचे दर पडूनही सरकारने वेळीच उपाययोजना केली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले. यापूर्वी कच्चे सोयातेल, कच्चे सूर्यफुल तेल आणि कच्चे पामतेल आयातीवर केवळ ५.५ टक्के शुल्क होते. तर रिफाइंड तेलावर सुमारे १४ टक्के आयात शुल्क होते. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातून स्वस्त खाद्यातेलाची आवक होऊन देशातही भाव कमी झाले होते. याचा परिणाम देशात उत्पादित होणाऱ्या सोयाबीनसह तेलबिया पिकांच्या भावावर होत होता. शेतकरी आणि प्रक्रिया उद्योजक आयात शुल्कात वाढ करण्याची मागणी करीत होते. खाद्यातेलाच्या आयातीवर शुल्कवाढ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्यानंतर लगेच त्याचा परिणाम राज्यातील बाजारांमध्ये जाणवला होता. जागतिक पातळीवर सोयाबीन उत्पादन आणि गाळप वाढत आहे. त्यामुळे सोयातेल आणि सोयापेंड निर्मितीही वाढली. पुरवठा वाढून भावावर जागतिक दबाव येत आहे. अन्य देशांच्या तुलनेत भारतात उत्पादकता कमी असल्याने स्पर्धेत आपला टिकाव लागत नाही. भारतीय सोयाबीनची उत्पादकता ही जागतिक सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. त्यामुळे हमीभावापेक्षा अधिक भाव मिळावे, यासाठी सरकारला आणखी प्रयत्न करावे लागणार असून, आयात निर्यात धोरणाबाबतसुद्धा एक योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे अन्यथा सोयाबीनचे हे बिघडलेले अर्थकारण आणखी बिघडत जाण्याची शक्यता आहे. हे अर्थकारण सुधरवणे शक्य असून त्यासाठी शेतीवर शासनाला प्रामाणिकपणे लक्ष देण्याची गरज आहे.

# 1 ऑक्टोबर - जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन



**आम्ही म्हातारे नव्हे,
तर महा-तारे**

भारतीय संस्कृतीत ज्येष्ठ नागरिकांचे स्थान नेहमीच मानाचे राहिले आहे.ते परिवाराचे आधारवड असल्याने त्यांना समाजाचा अनमोल ठेवाही म्हटला जातो.या पार्श्वभूमीवर त्यांच्या छत्रछायेत लहानाचे मोठे झालेल्या प्रत्येक सदस्याने त्यांना सन्मानाची-आदराची वागणूक देणं,हे खऱ्या अर्थानं युवकांचे कर्तव्यच आहे.आजच्या पिढीने एक गोष्ट लक्षात ठेवावी की,तुम्ही जशी वागणूक तुमच्या आई-वडिलांना देत आहेत,तशीच वागणूक पुढे तुमची मुलं तुम्हाला देतील.म्हणूनच म्हणतात ना,"करावे तसे भरावे". मित्रहो,प्रत्येकाला काळानुरूप वृद्धापकाळाला सामोरे जावेच लागते.म्हणून युवा-युवतींनी आपल्या घरातील वडीलधारी मंडळीला आपलेपणाच्या भावनेने वागावे.यातच कुटुंबाचा आनंद समावलेला असतो.प्रत्येकाने सुख-दुःखात एकमेकांचा आधार बनावा.यातच मानवी जीवनाची सार्थकता असते.

मित्रहो,१ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून १९९१ पासून साऱ्या विश्वात साजरा केला जात आहे.अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड रिगन यांनी जगातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांवर तोडगा निघावा.त्यांच्या आर्थिक,सामाजिक,सुरक्षा,आरोग्यविषयक न्याय्य मागण्यांवर प्रकाश टाकावा,त्यांच्या जीवनातील दाहकता नाहीशी व्हावी अन् त्यांना सर्वच ठिकाणी सन्मानाची वागणूक मिळावी,ही त्यामागील कारणे असून त्यासाठी जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा केला जात असतो.

महाराष्ट्राची लोकसंख्या सुमारे १३ कोटी आहे. त्यातील जवळ जवळ १० टक्के लोकसंख्या ज्येष्ठांची आहे. महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे(फेस्कोम)ब्रीद वाक्य आहे,जगण्यासाठी खा,खाण्यासाठी जगू नका.हसण्यासाठी जगा,जगण्यासाठी हसा त्यानुसार ज्येष्ठ बंधू भगिनींनी आपल्या जीवनाची मार्गक्रमणा करावी,हे अभिप्रेत आहे.या महासंघाच्या राज्यात तालुका अन् जिल्ह्यांच्या ठिकाणी रजिस्टर संघ/ संस्था आहेत.राज्य शासनाच्या सामाजिक न्याय अन् नगर विकास या विभागांशी या महासंघाची मुख्यतः सलग्नता असते.अत: ज्येष्ठ नागरिकांनी आपापल्या विभागातील ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्यत्व घ्यावे.तसेच त्यांच्या माध्यमातून तहसीलदार कार्यालयाद्वारे ज्येष्ठ नागरिक कार्ड प्राप्त करून घ्यावे.हे कार्ड आपल्याला विविध शासकीय कामांसाठी उपयुक्त ठरेल.

दारिद्र्यरेषेखालील अन् ज्यांना पेन्शन नाही म्हणजेच अल्पउत्पन्न गट गटातील ज्येष्ठांना अन्नपूर्णा आणि अंत्योदय योजनेखाली अल्पदरात वा मोफत प्रतिमाह रेशनकार्डवर ५ किलो व अन्य वस्तू मिळतात.त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयात समुपदेशन केंद्रे स्थापन केलेली असतात.ज्येष्ठांवर घरच्या मुलाने छळवणूक,जोरजबरदस्ती केली,तर त्याच्याविरुद्ध तक्रार केल्यास त्यावर त्वरित फौजदारी कारवाई होऊन तीन महिन्याच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते.एखादा पोटचा मुलगा आई-वडिलांना वागत नसेल,तर कायद्यानुसार सदर वृद्ध पालकांना पोटगी म्हणून संबंधित मुलाला १० हजार रुपये द्यावे लागतात. ही कायदेशीर तरतूद आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ अन् कल्याणकारी अधिनियम २००७ या कायद्यात केली आहे.हा कायदा केंद्र सरकारने पारित केला असून,तो देशभर लागू करण्यात आला आहे.

देशातील दारिद्र्य रेषेखालील तथा अल्पउत्पन्न गटातील ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यविषयक बाबींसाठी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना कार्यान्वित केली आहे.या योजनेअंतर्गत ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना प्रतीवर्ष ५ लाख रुपयांपर्यंतची आरोग्य सेवा मोफत केली असून,ते आपल्या ५ लाखापर्यंतच्या शस्त्रक्रिया मोफत करू शकतात.सदर योजना ज्येष्ठांसाठी वरदान ठरली असून,जगातील सर्वात मोठी सार्वजनिक आरोग्य विमा योजना आहे.

याशिवाय राज्यातील महायुतीच्या शिंदे सरकारतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना,मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे ७५ वर्षांवरील वृद्धांना मोफत प्रवास बस सवलत तर,६५ वर्षांच्या ज्येष्ठांसाठी ५० टक्के बस प्रवास सवलत देण्यात आली आहे.त्याचप्रमाणे महात्मा फुले जनआरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना,श्रावण बाळ राज्य निवृत्ती योजना एवं इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनादेखील ज्येष्ठ नागरिकांसाठी राज्य सरकारतर्फे लागू केल्या गेल्या आहेत.या सर्वांसाठी आपले आधारकार्ड राष्ट्रीयकृत बँकेशी लिंक असावे अन् पिवळे/ केशरी रेशनकार्ड आपल्यापाशी असणं आवश्यक आहे. अत: ज्येष्ठांनी सदर योजनांचा लाभ घेऊन आपले जीवन सुसह्य,निरोगी,समाधानी व आनंदी करावे,असे आवाहन करण्यात येते.

नटसम्राट या नाटकात ज्येष्ठांना सूचक सल्ला दिला आहे.त्यानुसार ज्येष्ठांनी आपल्या जीवनाची मार्गक्रमणा करावी.ज्येष्ठांनी मुलांना आपल्या समोरचे ताट द्या,पण पाट देऊ नका म्हणजे भावनावश होऊन घाईगर्दीने आपली सर्वच पूंजी जिवंतपणी मुलांना कदापि देऊ नका.कारण ती तुमच्या आयुष्याची ढाल असते. कायदेशीर बाब म्हणजे आपल्या हयातीत आपले इच्छापत्र(मृत्यूपत्र) लिहून ठेवावे. जेणेकरून आपल्या मृत्युनंतर कुटुंबातील सदस्यांमध्ये इस्टेटवरून वाद उद्भवू नये.आपल्या प्रॉपर्टी मधील थोडा भाग विवाहित तथा अविवाहित मुलींसाठी देखील ठेवावा. इच्छापत्रात तशी नोंद करावी.कारण त्यांचाही वडिलांच्या मालमत्तेवर अधिकार असतो. ज्येष्ठांच्या उत्तम आरोग्याच्या दृष्टीने विचार करावयाचा असल्यास,आपल्या जिभेवर ताबा ठेवणे हे अत्यंत गरजेचे आहे.सीमित आहार,झेपेल तेवढा व्यायाम(योगा,प्राणायाम, फिरणे वगैरे)आणि पुरेशी विश्रांती असा दैनंदिन कार्यक्रम असावा.महत्वाचे म्हणजे स्मृतीभ्रंश(अल्झायमर) सारखा गंभीर आजार जडू नये,यासाठी नित्यनेमाने वाचन करावे. त्यामुळे मेंदू सक्रिय होण्यास मदत होईल.अन् तो बधीर-निकामी होणार नाही.याशिवाय आध्यात्मिक क्षेत्रातही रस घ्यावा.कुटुंबात वावरताना विनाकारण ढवळाढवळ करू नये. दोन पिढ्यांमध्ये जनरेशन गॅप असल्याने विचारल्यावरच आपले मत द्यावे.जेणेकरून दोन पिढ्यात वाद निर्माण होणार नाही.ज्येष्ठांनी कधीही एकांतवासात(loneliness) राहू नये.कारण ते मानसिकदृष्ट्या हानीकारक असते.त्यासाठी आपल्या मित्रांमध्ये राहून विचारांचे आदानप्रदान करावे. त्यामुळे मनाला शांती,समाधान व आनंद मिळेल.

ज्येष्ठ स्त्री-पुरुषांनी रक्तदान, नेत्रदान,देहदान,स्वच्छता अभियान,हुंडा विरोधी अभियान या सामाजिक उपक्रमांमध्ये हिरीरीने भाग घ्यावा.त्यामुळे मन प्रसन्न,तर शरीर चपळ रहाते.ज्येष्ठ नागरिक संघांनी आपापल्या भागातील एकाकी जीवन जगणाऱ्या वृद्ध स्त्री-पुरुषांची नावे जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.जेणेकरून त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्या त्या क्षेत्राचा पोलीस निरीक्षक आठवड्यात एकदा त्या ज्येष्ठांच्या घरी जाऊन भेट घेत त्यांची विचारपूस करू शकतील.कारण एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ स्त्री-पुरुषांच्या जीवाला धोका उद्भवू शकतो.यास्तव त्यांची सुरक्षितता अत्यंत महत्वाची आहे.

या जन्मावर,या जगण्यावर शतदा प्रेम करावे या कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या अर्थपूर्ण संदेशाचे मर्म लक्षात घेऊन ज्येष्ठांनी आपल्या उर्वरित जीवनाची मार्गक्रमणा करावी.ज्याद्वारे आपले जीवन सुखी,आनंदी व आरोग्यदायी होईल,हे निश्चित! आम्ही म्हातारे नव्हे,तर महा.. तारे आहोत,याची मनात गाठ बांधून कोणाच्या सहाऱ्यावर विसंबून न रहाता,उलटपक्षी तुम्ही इतरांचे आधारवड बना. कारण आपण वृद्ध नव्हे,तर ज्येष्ठ आहोत.

जय हिंद!जय महाराष्ट्र!

**- रणवीर राजपूत,**
**ठाणे**

# अजरामर काव्य 'गीतरामायणाचे निर्माते'.. महाकवी. कै ग दि माडगूळकर



१ ऑक्टोबर ...

याच दिवशी मराठी सरस्वताच्या दरबारात ज्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते ते महाकवी कै ग दि माडगूळकर याचा जन्म १ ऑक्टोबर या दिवशी सांगली जिल्ह्यातील शेटफळ या गावी १९१९ साली झाला . त्यांचे शिक्षण कुंडल , औंध व आटपाडी येथे झाले . लहान पणी आईने जे संस्कार त्यांना दिले ते त्यांना आयुष्यभर पुरले . लहानपणी त्यांची आई त्यांना रामायण तसेच महाभारत मधील कथा व गोष्टी सांगत असे . त्या संस्कारावरच मराठी भाषेतील अजरामर कलाकृती " गीतरामायण " जन्माला आली . त्या काव्यप्रतिभेने वीर सावरकरांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. होते. माडगूळकरांना लहानपणापासूनच लिहण्याचा व नकला करण्याचा छंद होता. माध्यमिक शिक्षणानंतर ते कोल्हापूर येथे दाखल झाले . व चित्रपट व्यवसायात काम करू लागले .

कोल्हापूर येथे असताना त्यांना वि स खांडेकरांचा सहवास लाभला . त्यांचे लेखनिक म्हणून त्यांना संधी मिळाली होती त्याचा त्यांना खूपच फायदा झाला . त्यांच्या लेखनातील वैशिष्ट्ये त्यांना प्रत्यक्ष पहावयास मिळाली. त्याचे अक्षर डौलदार व रेखीव होते . हंस पिक्चर्स या मा विनायक यांच्या ब्रह्मचारी या चित्रपटापासून त्यांनी छोटी भूमिका करून आपल्या चित्रपट व्यवसायाला प्रारंभ केला . त्यानंतर त्यांनी " भक्त दामाजी " व " पहिला पाळणा " या चित्रपटासाठी गीत लेखनाला प्रारंभ केला. गीत लेखनातील छंदाबरोबरच त्यांनी नाना पाटील यांच्या आंदोलनात भाग घेतला होता . प्रति सरकारच्या कामात त्यांचे योगदान मोलाचे होते . देशभक्तीपर गीतांनी त्यांनी लोकांना स्वातंत्र्य लढाईसाठी प्रेरणा दिली. गीतकार ग दि माडगूळकर व शाहीर निकम यांनी तो काळ देशभक्तीपर गीताने अक्षरशः गाजविला होता . चैत्रबन, जोगिया व सुगंधी वीणा गीत रामायण, गीता गोपाल व गीता सौभद्र हे त्यांचे काही काव्यसंग्रह . गीतरचनेबरोबरच त्यांनी काही ललित लेखन सुद्धा केले आहे . मंतरलेले दिवस हे त्यांचे आत्मचिंतनपर पुस्तकसुद्धा प्रसिद्ध आहे मराठी चित्रपटाबरोबर काही हिंदी चित्रपटाच्या गीतांच्या रचनाही त्यांनी केल्या आहेत . लाखाची गोष्ट , बाळा जो जो रे, सांगते ऐका . जगाच्या पाठीवर, गुंज उठी शहनाई , दो आखे बारह हाथ हे त्यांचे काही गीतरचनेनी गाजलेले चित्रपट होत त्यांनी मराठी तील १४५ चित्रपटांना गीते, ८० चित्रपटांना पटकथा, ४४ मराठी चित्रपटांना कथा, ७६ चित्रपटांचे संवाद लेखन तसेच २३ हिंदी चित्रपटाच्या पटकथा यामध्ये आपले योगदान दिलेले आहे . याबरोबरच २५ मराठी व हिंदी चित्रपटात त्यांनी अभिनय ही केला आहे मराठी साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान अर्थातच यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांना १९७३ साली मिळाले होते . राजकीय क्षेत्रातही त्यांना काम करण्याची संधी मिळाली . महाराष्ट्र विधानपरिषदेवर त्यांची आमदार म्हणून नियुक्ती झाली होती .

१९६२ ते १९७४ या १२ वर्षाच्या काळात त्यांनी हे पद भुषविले त्यांच्या काव्य, ललित लेखन,याबद्दलच्या योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना पदमश्री हा पुरस्कार देऊन १९६९ साली गौरव केला होता . त्यांना संगीत नाटक अकादमीचे अवार्ड १९५१ साली मिळाले होते . ते काही काळ मराठी साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्यही होते . उणेपुरे ५८ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले . त्यांचे गीतरामायण जेव्हा आकाशवाणी पुणे वरून प्रसारित होत होते तेव्हा रसिकांनी त्यांना प्रचंड प्रतिसाद दिला होता . रेडिओ पाशी हे अजरामर काव्य ऐकण्यासाठी तुडुंब गर्दी होत असे या गीतरामायणाने त्यांना मराठी महाकाव्यातील " वाल्मिकी" बनविले सुधीर फडके यांनी या गीतांना साज चढविला होता. चित्रपट सृष्टीतील एक काळ राजा परांजपे, ग दि माडगूळकर, व सुधीर फडके या त्रयींनी गाजविला होता . त्यांची काही देशभक्ती व बालगीते प्रसिद्ध आहेत .त्यांच्या काही प्रसिद्ध गीतामध्ये घनःशाम सुंदरा, श्रीधरा ( अमर भूपाळी ) इथेच टाका तंबू, ( गुळाचा गणपती ) नाच रे मोरा ( देवबाप्पा ) पराधीन आहे जगती , माता न तू वैरिणी ( गीतरामायण ) जग हे बंदी शाळा , एक धागा सुखाचा ( जगाच्या पाठीवर ) ही त्यांची काही गाजलेली गीते . नादमधुरता , अलौकिक प्रतिभा, शब्द मधुरता व जीवनाचे तत्वज्ञान अशी काही त्यांच्या गाण्याची वैशीष्ट्ये सांगता येतील . आजही पाच दशकानंतर सुद्धा त्यांचे अजरामर काव्य" गीतरामायणाची गोडी अवीट आहे या गीतरामायणाचे हजारो प्रयोग झाले . गीतरामायणाच्या काव्य गायनाच्या कार्यक्रमाला रसिकांची प्रचंड गर्दी होते . अशा या प्रतिभावंत साहित्यिक, व महाकवीचे निधन १४ डिसेंबर १९७७ या दिवशी पुणे येथे झाले .त्यांना शतशः वंदन ... या महाकवीला केवळ ५८ वर्षाचे आयुष्य परमेश्वराने दिले ... ते अगदीच कमी दिले . त्यांना खरे तर शतायुषी करावयास हवे होते . असो नियतीपुढे कुणाचाच इलाज नाही पण जे परमेश्वराने त्यांना आयुष्य दिले त्याचे त्यांनी सोने करून दाखविले

- शांताराम वाघ,
पुणे

## पत्र मानस

### लाडकी बहीण योजना बंद करावी लागणार का?

'गुंतवणुकदारांना अनुदानाचे पैसे मिळतील का? याची शाश्वती नाही. कारण लाडकी बहीण योजनेतही पैसा द्यावा लागतो', असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले आहे.''लाडकी बहीण योजनेमुळे जानेवारीत पगार द्यायला सरकारच्या तिजोरीत पैसे राहणार नाहीत'',असे राज ठाकरे म्हणाले होते.'आम्ही लाडकी बहीण योजना बंद करायची का'? अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारची कानउघाडणी केली.जवळपास अडीच कोटी लाभार्थी महिलांना या योजनेचा लाभ देण्याचा महायुती सरकारचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.या योजनेसाठी इतर योजना बंद झाल्या आहेत. कोणत्याही योजनेला लागणा-या निधीची तरतूद करुनच योजना सुरु केल्यास त्या योजना मध्येच बंद कराव्या लागत नाही. सरकार अडीच कोटी लाभार्थी महिलांना आणखी गरीब करणार का? अडीच कोटी महिलांच्या हाताला काम देण्यात अपयशी ठरलेले राज्य सरकार जनतेचा पैसा महिलांना वाटून मताची मागणी करत आहेत. राज्याची आर्थिक घडी विस्कटलेली असताना नव्या योजनांना निधी पुरवणे कठीण जात आहे. इतर योजना बंद करुन महिलांना पैसे दिले तर महिलांना असा लाभ घेणे आवडेल का?

**- विवेक तवटे , कळवा , ठाणे**

## बनावटी तूप विक्री करणाऱ्या महिलेकडून 70 किलो तूप जप्त

**कल्याण :** सणासुदीचे दिवस असल्याने तुपाची मागणी वाढली आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात तुपाची विक्री होते. याचा फायदा घेत नकली तूप नामांकित ब्रँडच्या नावाखाली विकण्याच्या अनेक घटना उघड होतात. कल्याणमध्ये देखील अशीच एक घटना समोर आली आहे. यात एका महिलेला ताब्यात घेण्यात आले आहे. कल्याणच्या दुर्गाडी परिसरात एक महिला तूप विक्री करत होती. हे तूप बनावटी असल्याचा संशय आहे. सदर महिलेस केडीएमसीच्या अधिकाऱ्यांनी विचारपूस केली असता तिने उडवाउडवीची उत्तरे देत काही सांगण्यास तयारी दर्शविली नाही. विशेष म्हणजे तुपाच्या पॅकेटवर नामांकित कंपनीचे नाव आहे. यामुळे सदर महिलेला केडीएमसी अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले आहे. कल्याणच्या दुर्गाडी किल्ले परिसरात केडीएमसीच्या अधिकाऱ्यांनी जवळपास ७० किलो बनावटी तूप असल्याचा संशयावर एका महिलेला या तुपासह ताब्यात घेतले आहे. यानंतर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी याची माहिती अन्न आणि औषध प्रशासनास आणि पोलिसांना दिली असून पोलिसांनी पुढील प्रक्रिया सुरू केली आहे.



# गोमातेला राज्यमातेचा दर्जा देऊन एकनाथ शिंदेंनी हिंमत दाखवली

- जगद्गुरु शंकराचार्य स्वामीश्री अविमुक्तेश्वरानंदांकडून मुख्यमंत्र्यांचे कौतुक
- भागवत सत्संग सनातन राष्ट्र संमेलनात मांडली भूमिका

प्रतिनिधी
■ भाईंदर

देशात अनेक पंतप्रधान होऊन गेले अनेक मुख्यमंत्री होऊन गेले मात्र कोणीही गायीला मातेचा दर्जा दिला नाही. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज शासन निर्णय जारी करत गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिला. ज्यासाठी ७८ वर्ष वाट पहावी लागली, ती गोष्ट करण्याची हिंमत एकनाथ शिंदे यांनी आज दाखवली. या देशात ५६ इंचाची छाती एकाच व्यक्तीची आहे ती म्हणजे एकनाथ शिंदे, अशा शब्दांत जगद्गुरु शंकराचार्य स्वामीश्री अविमुक्तेश्वरानंद यांनी मुख्यमंत्र्यांचे कौतुक केले. मीरा भाईंदर येथे शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी आयोजित केलेल्या भागवत सत्संग सनातन राष्ट्र संमेलनात ते बोलत होते.



जगद्गुरु शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद पुढे म्हणाले की, महाराष्ट्र सरकारच्या निर्णयामुळे आज आम्ही अभिमानाने सांगू शकतो की आमच्या देशात गोमातेला राज्यमातेचा दर्जा आहे. सीएम अर्थात काऊज मॅन असे सांगत शंकराचार्य यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना शुभाशिर्वाद दिले. काही महिन्यांपूर्वी मुंबईत आपण राजकारणात विश्वासघाताला स्थान नाही, असे वक्तव्य केले होते. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुसरी बाजू मांडली. त्यानंतर आपण महाराष्ट्रातील कोट्यवधी लोक गायीला मातेच्या स्वरुपात बघु इच्छितात अशी इच्छा मुख्यमंत्र्यांकडे व्यक्त केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळात चर्चा करुन गोमातेला राज्यमातेचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला, असे जगद्गुरु शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद म्हणाले. गोत्र म्हणजे जे गायीचे रक्षण करतात तेच खरे हिंदू आहेत, असे त्यांनी निक्षून सांगितले.

आपण कोणत्याही राजकीय पक्षाचे नाहीत. आम्ही भारतीय संस्कृतीचे, सनातन धर्माचे आणि भारतीय लोकांचे प्रतिनिधी आहोत, असे शंकराचार्य म्हणाले. त्यामुळे भारताची भावना सडेतोड मांडणे आणि जो भारताच्या संबधी कार्य करेल त्याचे कौतुक करणे हा आमचा अधिकार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या देशात गायीविषयी बोलणे हा मोठा अपराध झाला आहे. आपण इस्लामाबाद किंवा कराचीत तर नाही ना, असा विचार मनात येतो. मात्र या कठिण काळात एकनाथ शिंदे यांनी ५६ इंचाची छाती दाखवत गायीला गोमातेचा दर्जा दिला. हा निर्णय भारताच्या परिवर्तनाची सुरुवात असून त्याचे प्रणेते एकनाथ शिंदे आहेत, असे ते म्हणाले.

# पंतप्रधान मोदींच्या नियोजित दौऱ्याच्या पूर्वतयारीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाणे शहरात कासारवडवली येथील वालावलकर मैदान येथे होणाऱ्या मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवार, दि.5 ऑक्टोबर 2024 रोजी उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान यांच्या या दौऱ्याचे नियोजन करण्यासाठी पूर्वतयारीची बैठक आज सोमवार, दि.30 सप्टेंबर रोजी वालावलकर मैदान, बोरीवडे या प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळी संपन्न झाली.

हवामान खात्याने वर्तविलेल्या पावसाची शक्यता लक्षात घेवून मुख्य सभामंडप, पार्किंग व्यवस्था येथील सर्व नियोजन करण्यात यावे. त्याचबरोबर वीज पुरवठा, इंटरनेट सेवा, आरोग्य सेवा यांची पर्यायी व्यवस्थाही उपलब्ध करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी यावेळी दिल्या. तसेच, या काळात मोठ्या प्रमाणावर वाहतूक होणार असल्याने ठाणे जिल्ह्यातील वाहतुकीसाठी बंद होणारे रस्ते, सेवा रस्त्यांच्या वापराची स्थिती आदींबाबत नागरिकांना अवगत करण्यात यावे, असे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी सांगितले.

सुमारे 40 हजार नागरिकांची उपस्थिती या कार्यक्रमास अपेक्षित असून ठाणे तसेच ग्रामीण व महापालिकांमधून सुमारे 1200 बसगाड्यांची ये-जा घोडबंदर रोड परिसरात होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा नियोजित दौरा शनिवार, 5 ऑक्टोबर 2024 रोजी होणार आहे. या दौऱ्यासाठी आवश्यक सर्व व्यवस्थांचे नियोजन करण्यासाठी विविध जबाबदाऱ्यांची निश्चिती करण्यात आली आहे. त्यानुसार, पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी ठाणे वालावलकर मैदान येथे बैठक झाली. या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे रोहन घुगे, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सर्जेराव म्हस्के-पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी विकास गजरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, उप विभागीय अधिकारी उर्मिला पाटिल, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागूल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, एमएमआरडीए, महामेट्रो अशा विविध महत्त्वाच्या विभाग/कार्यालयांचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

मुख्य सभामंडप, हेलिपॅड, गाड्या आणि बसेस पार्किंग व्यवस्था, वीज पुरवठा, सीसीटीव्ही नेटवर्क, जोड रस्ते यांच्या सद्य:स्थितीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. बसगाड्यांची पार्किंग व्यवस्था, अतिमहत्त्वाच्या व्यक्तीचे प्रवास मार्ग आदींबाबत या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी संदिप माने यांनी सादरीकरण केले. सुमारे 1200 गाड्यांच्या पार्किंगचे नियोजन महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने केले आहे. त्या जागा ताब्यात घेण्यात आल्या असून त्यांचे सपाटीकरण आदी कामाबाबत चर्चा करण्यात आली. तर, मुख्य सभामंडप आणि हेलिपॅड यांच्या व्यवस्थेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे यांनी माहिती दिली. या बैठकीनंतर उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळ व हेलिपॅड ठिकाणी एकत्रित पाहणी केली.

# अटल सेतूवर कार थांबवली अन् समुद्रात उडी मारली



प्रतिनिधी
■ नवी मुंबई

अटल सेतूवरून ४० वर्षांच्या व्यक्तीने समुद्रामध्ये उडी मारली. अटल सेतूवर कार पार्क करून या व्यक्तीने समुद्रात उडी मारली. घटनेची माहिती मिळताच शिवडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. समुद्रात उडी मारलेल्या व्यक्तीचा शोध सुरू आहे. पोलिस या कारच्या मदतीने ही व्यक्ती नेमकी कोण आहे? याचा शोध घेत आहे. काही दिवसांपूर्वी अटल सेतूवरून उडी मारत पुण्याच्या बँकरने आत्महत्या केली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवडी पोलिस स्टेशनच्या हद्दीतील अटल सेतू ८.५ किमी येथे एका व्यक्तीने समुद्रामध्ये उडी टाकून आत्महत्येचा प्रयत्न केला. आज सकाळच्या सुमारास ही घटना घडली. या व्यक्तीने अटल सेतूवर आपली कार उभी करून समुद्रात उडी मारली. घटनेची माहिती मिळताच तात्काळ वरिष्ठ पोलस निरीक्षक, ठाणे अमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी उडी मारलेल्या व्यक्तीची लाल रंगाची कार उभी आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटल सेतू नियंत्रण कक्ष येथील सीसीटीव्ही फुटेज तपासणी केली असता ही घटना सकाळी ९.५७ च्या सुमारास घडल्याचे दिसून आले. घटनास्थळी रेस्क्यू टीम आली असून आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या व्यक्तीचा शोध घेत आहेत. या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेऊन त्यांना संबंधित माहिती देण्यात येणार आहे.

# स्वच्छतेची सुरुवात स्वत: पासूनच करा - जाखड

प्रतिनिधी
■ पनवेल

स्वच्छतेची सुरुवात स्वत: पासूनच करावी, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी आज केले. "स्वच्छता ही सेवा" या अभियानांतर्गत महापालिका व पर्यावरण दक्षता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण मधील शालेय विद्यार्थ्यांसाठी घनकचरा जनजागृती व "पर्यावरण चित्रपट महोत्सव 2024" चे आयोजन प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिर येथे करण्यात आले होते.



त्यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधताना महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे आवाहन केले. आपल्या घरी व आपल्या आजूबाजूला देखील स्वच्छता राखण्याबाबत विद्यार्थ्यांनी स्वत:हून पुढाकार घेवून जनजागृती केली, तर आपल्या परिसर, आपले शहर स्वच्छ व सुंदर होण्यास मदत होईल. कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रत्येकाने RRR (Reduce, Reuse, Recycle) चा अवलंब करावा, असेही त्या पुढे म्हणाल्या.

यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, पर्यावरण दक्षता मंडळाचे मॅनेजिंग डायरेक्टर मिलींद मराठे, कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे, सहा.आयुक्त प्रिती गाडे, पर्यावरण दक्षता मंडळाच्या रुपाली शाईवाले उपस्थित होत्या.

## महत्त्वाचे

### घरफोड्या वाढल्याने नागरिक हैराण

**डोंबिवली :** येथील पश्चिमेतील विष्णुनगर पोलीस ठाणे हद्दीत गेल्या आठवड्यापासून घरफोड्यांचे प्रमाण वाढले आहे. बंद घरांची दरावाजे फोडून चोरटे चोरी करत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.डोंबिवली पश्चिमेत घनश्याम गुप्ते रस्ते भागात तक्रारदार आरती साळी या कुटुंबीयांसह राहतात. त्यांच्या घरात सागर थापा हा घरगडी म्हणून काम करत होता. तो मुळचा नेपाळचा राहणार आहे. गेल्या आठवड्यात त्या काही कामानिमित्त घराबाहेर गेल्या होत्या. या कालावधीत घरगडी सागर थापा याने तक्रारदार आरती साळी यांच्या इमारतीचे मुख्य प्रवेशव्दार लोखंडी धारदार सळईने उचकटले. त्याने साळी यांच्या घरात गुपचूप प्रवेश केला. घरातील शय्यागृहातील लोखंडी कपाटातील तिजोरी धारदार कटावणीने फोडून टाकली. या तिजोरीतील एक लाख ५७ हजार रूपयांचा ऐवज चोरुन नेला आहे. विष्णुनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी साळी यांनी तक्रार केली आहे. पोलीस उपनिरीक्षक अशोक शिनकर तपास करत आहेत.दुसऱ्या एका प्रकरणात, डोंबिवली पश्चिमेतील श्रीधर म्हात्रे चौकातील एका सोसायटीत राहणाऱ्या ऐश्वर्या विनोद निखाते यांच्या घराच्या बंद दरवाजाचा कडीकोयंडा तोडून चोरट्याने घरात प्रवेश करून घरातील एक लाख ४६ हजाराचा ऐवज चोरून नेला आहे. २ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर या कालावधीत हा चोरीचा प्रकार घडला आहे. विष्णुनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार करण्यात आली आहे. आणखी एका चोरीच्या प्रकरणात, गरीबाचापाडा येथील महालक्ष्मी चौकात गोपाळ चौधरी यांचे दुकान आहे. शुक्रवारी मध्यरात्री चोरट्याने चौधरी यांच्या दुकानाचे मुख्य लोखंडी व्दार उघडून दुकानात प्रवेश केला.

# अपघातात मृत पावलेल्या दुचाकीस्वाराच्या कुटूंबियांना साडेचार कोटींची नुकसान भरपाई

## मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाचे आदेश

■ ठाणे

नवी मुंबई येथील पनवेल-मुंब्रा मार्गावर दोन वर्षांपुर्वी ट्रकच्या धडकेत मृत पावलेल्या एका दुचाकीस्वाराच्या कुटुंबीयांना साडे चार कोटी रूपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने शनिवारी झालेल्या लोकअदालतमध्ये दिले.

नवीन पनवेल खांदा कॉलनी येथे पंकज शेडगे (३७) राहत होते. ते कांजुरमार्ग येथील इन्ग्राम मायक्रो इंडिया एसएससी प्रायव्हेट लिमिटेड या परदेशी कंपनीत काम करत होते. ९ डिसेंबर २०२२ रोजी ते काही कामानिमित्त पनवेल – मुंब्रा मार्गावरून दुचाकीने जात होते. या प्रवासादरम्यान एका ट्रकने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यात त्यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी नवी मुंबई येथील कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणी पंकज यांच्या कुटुंबीयांनी अपघात न्यायालयात नुकसान भरपाईसाठी दावा दाखल केला होता. या दाव्याची सुनावणी शनिवारी ठाण्यातील जिल्हा सत्र न्यायालयाने आयोजित केलेल्या लोकअदालतीत झाली. या सुनावणीत न्यायालयाने पंकज यांच्या कुटुंबीयांना साडे चार कोटी रूपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश न्यायाधीश एस.एन शाह यांनी दिले. शेडगे यांच्यातर्फे जी. ए विनोद यांनी तर विमा कंपनीच्यावतीने अरविंद कुमार तिवारी यांनी बाजू मांडली.

# कल्याण शहराचा पाणी पुरवठा आज बंद

■ कल्याण

कल्याण डोंबिवली पालिकेच्या बारावे येथील जलशुध्दीकरण केंद्रात महावितरणकडून मंगळवारी ((ता.१) रोहित्र दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. या दुरुस्तीच्या कालावधीत मंगळवारी सकाळी १० ते दुपारी चार वेळेत कल्याण पूर्व, पश्चिम शहरांचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे, असे कार्यकारी अभियंता राजू राठोड यांनी सांगितले.

बारावे जलशुध्दीकरण केंद्राला उल्हास नदीतून पाणी पुरवठा केला जातो. बारावे जलशुध्दीकरण केंद्राला महावितरणच्या बारावे येथील वीज पुरवठा केंद्रातून वीज पुरवली जाते. या वीज केंद्रातील क्रमांक चार व चौदा क्रमांकांच्या रोहित्राची देखभाल आणि दुरुस्तीचे काम महावितरणच्या अभियंत्यांकडून केले जाणार आहे. या दुरुस्तीच्या कामासाठी मंगळवारी सकाळी १० ते दुपारी चार असा सहा तास या केंद्राला होणारा पाणी पुरवठा पालिकेकडून बंद ठेवण्यात येणार आहे.

मंगळवारी कल्याण शहराला पाणी पुरवठा होणार नसल्याने नागरिकांनी अगोदरच एक दिवस पुरेल इतका पुरेसा साठा घरात करून ठेवावा, असे आवाहन पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे.

# मध्यवर्ती रुग्णालयात आरोपीकडून रुग्णावर हल्ला; रुग्ण गंभीर जखमी

प्रतिनिधी
■ उल्हासनगर

उल्हासनगरच्या विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात महिला पोलीस कर्मचाऱ्यावर ब्लेडने वार करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना तीन दिवसांपूर्वी घडली होती. यानंतर आता पुन्हा मध्यवर्ती रुग्णालयात उपचार घेणाऱ्या एका रुग्णावर त्याच आरोपीने हल्ला केला. यात रुग्ण गंभीर जखमी झाला आहे.

उल्हासनगरच्या विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यातील महिला पोलीस कर्मचाऱ्यावर बाबासाहेब सोनावणे याने ब्लेडने हल्ला केल्याची घटना तीन दिवसांपूर्वी घडली होती. हल्ला करताना बाबासाहेब सोनावणे हा देखील जखमी झाला होता. यामुळे त्याच्यावर उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात उपचार सुरू होते. दरम्यान यावेळी त्याच्या बाजूच्या बेडवर उपचार घेत असलेल्या सलमान सय्यद या तरुणावर आरोपी बाबासाहेब सोनावणे याने चक्क स्टीलच्या खुर्चीने हल्ला केला. सलमान सय्यद याच्या डोक्यात, तोंडावर खुर्चीने प्रहार केल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. आरोपी बाबासाहेब सोनवणे हा वेडसर असल्यासारखा वागत असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

# 'एक पेड माँ के नाम' आणि 'स्वच्छता दौड' या उपक्रमात हजारो विद्यार्थी उत्साहाने सहभागी

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

'स्वच्छता ही सेवा' मोहीम 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियान अंतर्गत विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छतेचा जागर करणारी असून स्वच्छता व पर्यावरण विषयक जाणीव जागरुकता निर्माण करणारी आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांवर स्वच्छता संस्कार करण्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. त्याचप्रमाणे पर्यावरण जागरुकतेवरही भर दिला जात आहे.




अशाच प्रकारचा 'एक पेड माँ के नाम' हा अभिनव उपक्रम अभियानांतर्गत स्वच्छ भारत मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महानगरपालिकेच्या तसेच खाजगी शाळांमध्ये उत्साहाने राबविण्यात आला. यामध्ये शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले व त्याला वृक्षारोपण करणा-या विद्यार्थ्याच्या आईचे नाव देण्यात आले. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी कुंडयांमध्येही रोपे लावली.

# फ्लॅश मॉबव्दारे मॉलमध्ये 'स्वच्छता ही सेवा' मोहीमेत जनजागृती



प्रतिनिधी
■ नवी मुंबई

'स्वच्छता ही सेवा' मोहीमेत व्यापक लोकसहभागावर भर देण्यात येत असून मोहीमेची मोठया प्रमाणावर प्रचार, प्रसिध्दी करुन जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत स्वच्छतेचा संदेश प्रसारित करण्यात येत आहे तसेच स्वच्छताविषयक विविध उपक्रमांमध्ये महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना सहभागी करुन घेण्यात येत आहे.

अशाच प्रकारचा फ्लॅश मॉब सारख्या संगीतमय कलाप्रकाराचा अभिनव उपक्रम सुट्टीच्या दिवशी मॉलमध्ये होणारी नागरिकांची गर्दी लक्षात घेऊन नेक्सस सीवूड मॉलमध्ये संध्याकाळी राबविण्यात आला. लोकांना चटकन आकर्षित करुन घेणा-या गीत-संगीताच्या माध्यमातून स्वच्छता ही सेवा पंधरवड्याची माहिती तसेच स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत प्रभावी रितीने पोहचविण्यात आला. या वेळी अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, समाजविकास विभागाचे उपआयुक्त श्री. किसनराव पलांडे यांनी उपस्थित राहून फ्लॅश मॉबमध्ये सहभागी आरंभ क्रिएशन्सच्या नृत्य कलावंतांचा उत्साह वाढवला.

मॉलमध्ये खरेदीत नागरिक दंग असताना अचानक मोठया आवाजात गीत - संगीत वाजायला सुरुवात झाल्यानंतर गाणे कुठे वाजते आहे याचा कानोसा घेऊन लोक आवाजाच्या दिशेने आकर्षित होत जमा झाले. त्यावेळी त्यांना मॉलच्या तळमजल्यावरील मोठया भागात तरुण – तरुणींचा समूह नृत्य करतांना दिसला. त्यांचे नृत्य बघण्यासाठी भोवतालची गर्दी वाढत गेली. अगदी दोन्ही मजल्यांवरील रेलींग जवळ येऊन नागरिक खाली चाललेला नृत्याविष्कार बघायला लागले. अचानक स्वच्छताविषयक गाणी वाजायला सुरुवात झाली आणि नृत्य करणा-या कलावंतासह मोठया संख्येने उपस्थित नागरिकही 'निश्चय केला - नंबर पहिला' असा घोष करतात. मॉलसारख्या वर्दळीच्या ठिकाणी अचानक सुरु झालेल्या गीत-संगीतमय फ्लॅश मॉबकडे उपस्थित नागरिक आकर्षित झाले व या माध्यमातून 'स्वच्छता ही सेवा' मोहीमेचा संदेशही प्रसारित झाला.

# कल्याणमधील दुर्गाडी किल्ल्याजवळील 40 फुटी रस्त्यावरील 22 अतिक्रमणे जमीनदोस्त

## भटाळे तलाव बुजवून उभारली होती बेकायदा बांधकामे

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या भटाळे तलावात भराव टाकून या भागातील ४० फुटी विकास आराखड्यातील रस्त्यावर स्थानिकांनी बेकायदा व्यापारी गाळे, तबेले, निवासी इमले उभारले होते. संवेदनशील भागातील विकास आराखड्यातील रस्ता बाधित झाल्याने या रस्त्याचे रुंदीकरण रखडले होते. शनिवारी कल्याण डोंबिवली पालिकेच्या पथकांनी पोलीस बंदोबस्तात या रस्ते मार्गातील सर्व बेकायदा अतिक्रमणे पोकलेन, जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त केली.



ही कारवाई करताना या भागातील माजी नगरसेवक, काही स्थानिकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला. बाजारपेठ पोलिसांनी विरोध करणाऱ्या माजी नगरसेवकाला ताब्यात घेऊन कारवाईत कोणताही अडथळा येणार नाही याची काळजी घेतली.

ही कारवाई करण्यापूर्वी क प्रभागाचे साहाय्यक आयुक्त तुषार सोनवणे यांनी अतिक्रमण करणाऱ्या व्यावसायिकांना पूर्व सूचना नोटिसा दिल्या होत्या. शनिवारी सकाळी उपायुक्त प्रसाद बोरकर, साहाय्यक आयुक्त तुषार सोनवणे, सर्वेअर संजय पोखरकर, साहाय्यक आयुक्त सोनम देशमुख, सविता हिले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर गौड आणि तोडकाम पथकाचे ४० कर्मचारी, पोलीस आणि जेसीबी पथकाने भटाळे तलावाजवळील ४० फुटी रस्त्यावरील अतिक्रमणांवर कारवाई सुरू केली.

ही कारवाई सुरू करण्यापूर्वी तबेल्यांमधील सुमारे तीनशेहून अधिक म्हशी सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आल्या. कारवाईत अडथळा आणण्यासाठी तबेले चालकांनी म्हशी हेतुपुरस्कर तबेल्यात बांधून ठेवल्या होत्या. कारवाई सुरू होताच एका माजी नगरसेवकाने या कारवाईत अडथळा आणून घोषणाबाजी केली. पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेऊन त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली.

गेल्या पंधरा वर्षाच्या कालावधीत या भागातील स्थानिकांनी भटाळे तलावात भराव टाकून तलावाजवळून गेलेल्या या भागातील विकास आराखड्यातील ४० फुटी रस्त्यावर अतिक्रमणे केली होती. हा भाग संवेदनशील असल्याने यापूर्वीचे पालिका अधिकारी या अतिक्रमणांवर कारवाई करण्यास कुचराई करत होते.

## टीएमसीने अल्टीमेट स्लिमवेल जिमला केले सिलबंद

**ठाणे :** रहिवासी सोसायटीच्या हद्दीत बेकायदेशीर सुरु असलेल्या अल्टीमेट स्लिमवेल जिमवर टीएमसी ने टाळेबंदी कारवाई केली आहे. ठाणेच्या रहिवासी सोसायटीतील 3 फ्लॅट्स जोडून ही व्यावसायिक व्यायामशाळा बांधण्यात आली होती. याबाबत सोसायटीतील तक्रारीनंतर ठाणे महापालिकेने वृंदावन सोसायटीतील स्लिमवेल जीम सील केली आहे, ठाणे महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांनी या कारवाई बाबत सांगितले की स्थानिकांनी महापालिकेला या संदर्भात माहिती दिली होती नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी टीएमसीने ही कारवाई केली आहे. ज्या सोसायटीत असे बेकायदेशीर कृत्ये होतात, तेथे येत्या काळात कारवाई केली जाईल, असेही आहेर यांनी सांगितले.



# विद्याभवन हायस्कूल नं. 2 ने तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत पटकाविली तीन अजिंक्यपदे



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने शनिवार 28 सप्टेंबर 2024 रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई आयोजित 17 वर्षाखालील मुलांची तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धा अंधेरी येथील राजहंस विद्यालयात उत्साहाने पार पडली. एकूण 22 संघ सहभागी झालेल्या या स्पर्धेत पुणे विद्याभवन हायस्कूल नं. 2 च्या मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात सेंट ग्रेगोरीयस हायस्कूल, चेंबूर या संघाला 6 गुणांनी हरवून तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले. विशेष म्हणजे विद्याभवन हायस्कूल नं. 2 च्या 14 वर्षाखालील मुली, 17 वर्षाखालील मुली आणि 17 वर्षाखालील मुले या तीनही बास्केटबॉल संघांनी तालुकास्तरीय अंतिम विजेतेपद पटकाविले आहे. संघाचे प्रशिक्षक सोनेश झोरे यांच्यासह सर्व विजेत्या खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बो-हाडे, मुख्याध्यापक सुनील पाटील आदिसह सर्व पदाधिकारी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या तिन्ही संघांचे कौतुक करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

पुणे विद्याभवन हायस्कूलमध्ये या यशाबद्दल गौरव सोहळा संपन्न झाला याप्रसंगी विद्याभवन हायस्कूल नं 2, चे 14 वर्षाखालील मुली, 17 वर्षाखालील मुली व 17 वर्षाखालील मुले यांचे तालुकास्तरावरील विजेते संघ. सोबत संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बो-हाडे, मुख्याध्यापक सुनील पाटील व इतर सन्माननिय पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# टीम इंडियाची 'दे दनादन' फलंदाजी 52 धावांची आघाडी घेत केला पहिला डाव घोषित

**वृत्तसंस्था**
■ **कानपूर**

भारतीय संघ आपल्या धावांचा गिअर कसा आणि कधी बदलू शकतो, याचे प्रात्यक्षिक कानपूर कसोटीच्या चौथ्या दिवशी टीम इंडियाने दाखवले. तीन दिवस पावसामुळे वाया गेल्याने हा सामान अनिर्णीत राहील, असे म्हटले जात होते. पण भारताने पहिल्या डावात धडाकेबाज फलंदाजी करत झटपट आघाडीही घेतली.या आघाडीसह भारताने आता विजयाचे दार उघडले आहे. लोकेश राहुलने यावेळी ६८, तर यशस्वी जैस्वालने ७२ धावा केल्या.चौथ्या दिवस अखेर पाहुण्यांचा दुसरा डाव २ बाद २६ अशा दोलायमान स्थितीत होता.त्यामुळे पाचव्या दिवशी बांग्लादेशी फलनदाजांना कसोटी वाचवण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे.

भारताने आपल्या पहिल्या डावाची तुफानी सुरुवात केली. रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल हे बांगलादेशच्या गोलंदाजीवर तुटून पडले.आक्रमण हे एकच ध्येय त्यांच्या फलंदाजीत दिसत होते. पण रोहित शर्मा यावेळी जास्त काळ टिकाव धरू शकला नाही. रोहित शर्मा यावेळी ११ चेंडूंत २३ धावा करून बाद झाला. रोहित बाद झाला तरी यशस्वी जैस्वाल हा जोरदार फटकेबाजी करत होता. यशस्वी

## बांग्लादेशपुढे कानपुर कसोटी वाचवण्याचे आव्हान




***१० षटकांत १०० धावा कुटल्या***

*रोहित आणि जयस्वालच्या जोडीने मैदानात येताच बांगलादेशवर हल्लाबोल केला. रोहितला चांगली सुरुवात मिळाली मात्र डाव पुढे घेऊन जाता आला नाही. त्याला या डावात २३ धावा करता आल्या.दोघांनी सलामीला फलंदाजी करताना ३ षटकात ५० धावांचा पल्ला गाठला. यापूर्वी कुठल्याच सलामी जोडीने ३ षटकात ५० धावांचा पल्ला गाठला नव्हता. यासह अवघ्या १० षटकात भारतीय फलंदाजांनी १०० धावांचा पल्ला गाठला. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यादांच कुठल्या संघाने १० षटकात १०० धावांचा पल्ला गाठला आहे.*

जैस्वालने यावेळी सर्वात जलद अर्धशतक पूर्ण केले. यशस्वीने यावेळी ५१ चेंडूंत १२ चौकार आणि २ षटकारांच्या जोरावर ७२ धावा केल्या. यशस्वी बाद झाल्यावरही भारताने फटकेबाजी सुरुच ठेवली.

यशस्वीनंतर शुभमन गिलला ३९ धावा करता आल्या, तर ऋषभ पंत यावेळी ९ धावांवर बाद झाला. पण त्यानंतर लोकेश राहुल आणि विराट कोहली यांची जोडी चांगलीच जमली होती. या दोघांनी अर्धशतकी भागदारी रचली. लोकेश राहुलने यावेळी दमदार अर्धशतक झळकावले. पण विराट कोहलीला यावेळी ४७ धावा करता आल्या, फक्त तीन धावांनी त्याचे अर्धशतक हुकले.

बांगलादेशचा पहिला डाव चौथ्या दिवशी सुरु झाला तो ३ बाद १०७ धावांवरून. त्यानंतर बांगलादेशच्या मोमिनूल हकने अशतक झळकावले आणि त्यामुळेच बांगलादेशला २०० धावांचा पल्ला गाठता आला. हकने यावेळी १७ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर नाबाद १०७ धावांची खेळी साकारली. भारताच्या गोलंदाजांनी चौथ्या दिवशी कमाल केली. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक तीन बळी मिळवले. बुमराहला मोहम्मद सिराज, आकाश दीप आणि आर. अश्विन यांनी प्रत्येकी दोन विकेट मिळवत चांगली साथ दिली. त्यामुळे बांगलादेशच्या संघाला २३३ धावांत भारताला ऑल आऊट करता आले.

भारताने चौथ्या दिवशी चांगली आघाडी घेतली आहे. त्यामुळे आता भारतीय संघ पाचव्या दिवशी कशी कामगिरी करतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले असेल. बांगलादेशचा दुसरा डाव दिवसाखेर २ बाद २६अशा चिंताजनक स्थितीत होता.त्यामुळे पाचव्या दिवशी बांग्ला वाघांची अश्विन अण्णाची फिरकी आणि बुमराह ,सिराज आणि आकाशदीप या वेगवान गोलंदाजांपुढे कसोटी लागणार आहे.

# महाराष्ट्राच्या किशोर, किशोरी संघांचा उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश



**वृत्तसंस्था**
■ **सिमडेगा**

पुष्पुर येथील अलबर्ट एक्का स्टेडियमवर सुरू असलेल्या ३४व्या किशोर-किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोर व किशोरी संघाने उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

झारखंड राज्य खो-खो असोसिएशनने आयोजित केलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोर संघाने साखळीतील त्रिपुराविरुद्धच्या पहिल्या सामन्यात एक डाव ३६ गुणांनी दणदणीत विजय मिळवला. शेवटच्या साखळी सामन्यात सामन्यात त्यांनी विदर्भचा एक डाव आणि २८ गुणांनी पराभव केला.

महाराष्ट्र संघाकडून खेळताना श्री दळवीने ३.०० मिनिट संरक्षण करत २ गडी बाद करीत अष्टपैलू खेळ केला. सुरेश वसावेने २.१० मी., २.३० मी. संरक्षण केले. भीमसेन वसावेने अष्टपैलू खेळ करताना नाबाद १.५० मी. संरक्षण करीत २ गडी बाद केले. सुरेश चव्हाणने ४ गडी टिपले. किशोरी गटात महाराष्ट्राने तेलंगणा, दिल्ली, सिक्कीम आणि त्रिपुरावर दणदणीत विजय मिळवत गटात अव्वल स्थान पटकावले.

साखळीतील शेवटच्या सामन्यात महाराष्ट्रच्या मुलींनी तेलंगणावर १ डाव आणि ४ गुणांनी विजय नोंदवला. सिद्धी तामखडेने दोन्ही डावात ४.१० मी. आणि ४.०० मी. संरक्षण करताना १ गडी बाद केला. तिच्या या अष्टपैलू खेळामुळे महाराष्ट्राचा विजय अगदी सोपा झाला. तिला सिद्धी भोसले १.३० मी., वेदिका तामखडे २.१० मी संरक्षणाची तर अपूर्वा वर्दे आणि प्रणिती जगदाळे प्रत्येकी २ गडी बाद करीत साथ मिळाली.

# रेल्वेचे रणजीपटू, प्रशिक्षक नरेश चुरी यांचे निधन



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

रेल्वे संघातून स्टायलिस्ट डावखुरी फलंदाजी करणारे नरेश चुरी यांचे आज अल्पशा आजाराने मुंबईत निधन झाले. निधनसमयी ते ६० वर्षांचे होते. चुरी यांनी मुंबईत वास्तव्य करताना अनेक युवा होतकरू क्रिकेटपटूही घडवले. ते हरहुन्नरी क्रिकेट प्रशिक्षकही होते.त्यांच्या निधनाने मुंबईने एक प्रतिभावंत क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक गमावल्याची प्रतिक्रिया क्रिकेटवर्तुळात व्यक्त होत आहे.रेल्वे संघाचे बिनीचे क्रिकेटर म्हणून क्रिकेटविश्वात चुरी यांच्या नावाचा दबदबा होता.चुरी यांच्या पार्थिवावर सोमवारी रात्री शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांना अंतिम निरोप देण्यासाठी क्रिकेट क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# मुंबईकर मुशीरने मानले एमसीए, बीसीसीआयचे आभार

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भारतीय क्रिकेटपटू सरफराज खानचा भाऊ मुशीर खान याचा गेल्या शनिवारी अपघात झाला. यानंतर आता मुशीर खानने सोशल मीडियावर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये त्याच्या गळयात बेल्ट बांधलेला आहे. व्हिडिओमध्ये मुशीरने मुंबई क्रिकेट असोसिएशन आणि बीसीसीआयकडून मिळालेल्या पाठिंब्याबद्दल आभार मानले आणि चाहत्यांचे आभारही मानले.

युवा अष्टपैलू खेळाडू मुशीर खानची फॉर्च्युनर कार 2 दिवसांपूर्वी आझमगडहून लखनौला जात असताना पूर्वांचल एक्स्प्रेस वेवर वेगात पलटी झाली होती. तो वडील नौशाद यांच्यासोबत इराणी चषक स्पर्धेत भाग घेण्यासाठी जात होता. या अपघातात मुशीर यांच्या मानेला दुखापत झाली. त्यामुळे मुशीर इराणी कपमधून बाहेर पडला आहे.

# 'शहाणपण देगा देवा' मोहीमेमुळे प्रदूषण जागृती आणि पर्यावरण संवर्धनामध्ये प्रगती

## एमपीसीबीचे अध्यक्ष सिद्धेश रामदास कदम

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) चे अध्यक्ष सिद्धेश रामदास कदम यांच्या नेतृत्वाखालील "शहाणपण देगा देवा" मोहिमेने आपल्या वातावरणातील प्रदूषण कमी करणे आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने जागरुकता वाढवण्याच्या दृष्टीने उल्लेखनीय काम केले जात आहे. या उपक्रमामध्ये सहभाग घेणाऱ्या सर्वांनी सदरील उपक्रमाची यशस्वीरित्या अंमलबजावणी केली तर स्वच्छ वातावरण निर्मितीकडे वाटचाल करण्यास इतरांना प्रेरित करता येईल.

या मोहिमेचा प्रभाव विविध माध्यमांद्वारे पोहचत आहे, ज्यात डिजिटल बिलबोर्ड जाहिरातींचा समावेश आहे, जे पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करतात. एमपीसीबीचे अध्यक्ष सिद्धेश रामदास कदम म्हणाले, "शहाणपण देगा देवा मोहिमेने हे सिद्ध केले आहे की, सामूहिक कृतीमुळे लक्षणीय बदल होऊ शकतात आणि सर्वांनीच आपल्या पर्यावरणाची जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. आपल्या धार्मिक श्रद्धांचा आदर करत शहरातील नदी/ तलावांवर होणाऱ्या हानिकारक प्रदूषणाच्या परिणामांपासून पर्यावरणाचे संरक्षण



करण्याच्या दिशेने आम्ही पावले उचलली आहेत. ही तर फक्त सुरुवात आहे."

2023 मध्ये, सुमारे 76,000 इको फ्रेंडली गणेश मूर्तींचे 191 कृत्रिमरित्या तयार केलेल्या तलावांमध्ये विसर्जन करण्यात आले होते, हे संपूर्ण शहराने पहिले. परंतु यावर्षी "शहाणपण देगा देवा" मोहिमेद्वारे, MPCB ने जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न केला. तसेच नागरिकांना स्मार्ट आणि पर्यावरणपूरक निर्णय घेण्यास प्रोत्साहित केले. याचा थेट परिणाम मुंबईतील नागरिकांवर होऊन यावर्षी 82,000 हून अधिक घरगुती व सार्वजनिक इको फ्रेंडली मूर्तींचे शहरभरातील 204 कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करण्यात आले. या जनजागृती मोहिमेने भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवेगार आणि स्वच्छ पर्यावरण निर्माण करण्याच्या MPCB च्या वचनबद्धतेचे उदाहरण प्रस्थापित केले आहे.

आगामी सणासुदीच्या हंगामात, MPCB अतिरिक्त शैक्षणिक मोहिमांसाठी योजना जाहीर करून पर्यावरण संवर्धनाच्या पद्धतींच्या महत्त्वाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी वचनबद्ध आहे. ज्याचा उद्देश प्रदूषण कमी करणे, ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण आणणे आणि हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी वचनबद्ध असणे हा आहे. जागरुकता वाढवणे आणि जबाबदारी घेणे या घटकांना प्रोत्साहन देऊन वातावरणीय बदल घडवून आणणे, ही MPCB ची महत्वाकांक्षा आहे.

**लिंक: https://www.instagram.com/reel/C_2jgqRhm3t/?igsh=dWRlMXdlYjdvN2Jw**



***मुंबई : गुरूतेग बहादुर नगर येथील बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत के.डी.गायकवाड महानगरपालिका हिंदी शाळा क्रमांक १ चे मुख्याध्यापक राजेश बारी यांचा सेवानिवृत्ती समारंभ काल शाळेत संपन्न झाला. अध्यक्षस्थानी माजी प्रशासकीय अधिकारी शिक्षणतज्ज्ञ रामहित बी.यादव आणि प्रमुख अतिथी माजी उप शिक्षणाधिकारी जय यादव, हवलदार सिंह आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.***

# रेल्वेने गेल्या 10 वर्षांत केलेल्या प्रयत्नांमुळे अपघातांची संख्या लक्षणीयरीत्या झाली कमी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भारतीय रेल्वेने गेल्या १० वर्षांत केलेल्या प्रयत्नांमुळे अपघातांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. २००४ ते १४ पर्यंत दरवर्षी ४४५ अपघात झाले. त्यापैकी १७१ मुख्य मार्गावर तर २७४ यार्डमध्ये घडले. हे दररोज सरासरी १.२ रुळावरून घसरल्याने घडले आहे. तर २०२३-२४ मध्ये हाच आकडा ८९ पर्यंत कमी झाला आहे. यापैकी ४० मेन लाईनवर तर ४९ यार्डमध्ये रुळावरून घळरून झाले आहेत. आता रुळावरून घसरण्याचे प्रमाण दररोज सरासरी प्रमाण सुमारे ०.२४ वर आले आहे. या वर्षात आत्तापर्यंत एकूण ४३ अपघात झाले असून त्यापैकी २० मेन लाईनवर तर २३ विविध यार्डमध्ये घडल्या आहेत.

सरासरी दररोज ०.२४ अपघात झाले आहेत. दरवर्षी शून्य अपघाताचा आकडा गाठण्याचे लक्ष्य रेल्वेचे नेहमीच असते तशी रास्त अपेक्षा जनतेकडून असते. संपूर्ण भारतीय रेल्वेवर रुळावरून घसरण्याचे शून्य लक्ष्य गाठण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्नशील आहे. सातत्यपूर्ण प्रयत्न आणि पायाभूत सुविधांच्या सुधारणा आणि जोडणीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळे रुळावरून घसरणयाच्या घटनांमध्ये लक्षणीय घट झाली आहे.


**महाराष्ट्र शासन**
**निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, मुंबई उपनगरांचे कार्यालय**
**मालवणी एक्साईज कार्यालय, मार्वे रोड, मालवणी, मालाड(प.) मुंबई- ४०० ०१५**
ई मेल: exise.inspector.wdiv@gmail.com

वाचले : मा. अधीक्षक, राज्य अपादन शुल्क, मुंबई उपनगर यांचे आदेश क्र. डीईटी ११२०२३/१०९१३/डबल्यू/१३०/ई-४/२३३० मुंबई दि. ०७६ नोव्हेंबर २०२३

**जाहीर लिलावाची नोटीस**

याद्वारे सर्व आम जनतेला सुचित करण्यात येते की, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, डब्ल्यु विभाग, मुंबई उपनगर या कार्यालयाने महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यातील जप्त केलेला मुद्देमाल (रिकाम्या मद्याच्या बादल्या व इतर साहित्य) खालील तारखेस, वेळेस व स्थळी जाहीर लिलावाद्वारे विक्री करावयाचे आहे. सदर मुद्देमाल खालील नमूद शर्ती व अटीच्या अधिन राहून सर्वात जास्त बोली लावणाऱ्यास विक्री केला जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

**जाहीर लिलावाचा दिनांक: ०३ ऑक्टोबर, २०२४ वेळ सकाळी ११.३०**

**स्थळ -** निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, न्यू विभाग, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

**लिलावाच्या शर्ती**

१. मुद्देमाल जागेवरच नाश केला जाईल
२. सदर मुद्देमालाचा उपयोग दारुबंदी कायदा १९४९ खालील प्रतिबंधित असल्याने उपयोगात आणता येणार नाही किंवा पुन्हा वापरता येणार नाही.
३. लिलावयुक्त मुद्देमालाकरिता सर्वांत जास्त बोली बोलणाऱ्यास मुद्देमाल विक्री केला जाईल। तथापि बोलीची रक्कम अपेक्षित रकमेपेक्षा कमी असल्यास बोली नाकारण्याचे अधिकार या कार्यालयास राहील.
४. बोलीची रक्कम लिलाव संपताच त्वरीत भरावी लागेल त्याशिवाय विकलेला माल ताब्यात देण्यात येणार नाही व बोली रद्द करण्यात येईल

**सही/-**
**निरीक्षक**
**राज्य उत्पादन शुल्क,**
**डब्ल्यु विभाग, मुंबई उपनगर**



**पश्चिम रेल्वे**
**दूरसंचार सुविधांची तरतूद**

वरिष्ठ विभागिय संकेत आणि दूरसंचार अभियंता (उत्तर), २ रा मजला, विभागिय रेल्वे व्यवस्थापक ह्यांचे कार्यालय, मुंबई सेन्ट्रल, मुंबई – ४०० ००८ निविदा क्र. डब्ल्यूआर-एमएमसीटी0एसएनटी(एसटीईएस)/२८/२०२४ दिनांकित: १८/९/२०२४; कामाचे नाव आणि ठिकाण : पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागामधील अमृत भारत स्थानक योजनेच्या अंतर्गत पालघर स्थानक येथे दूरसंचार सुविधांची तरतूद. कामाचे अंदाजे मूल्य: रु. १२४५७८७३.३२/-; इरठे: रु. २१२३००/-; ई-निविदा कागदपत्रांच्या सादरीकरणासाठी समाप्तीकरीता शेवटचा दिनांक आणि वेळ : २१/१०/२०२४ रोजी ११:०० वा.; ई-निविदेच्या उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २१/१०/२०२४ रोजी ११:३० वा. अधिक तपशीलासाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या. प्रत्यक्ष आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.
0573
आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly



**पश्चिम रेल्वे**
**पीवे देखभाल काम**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६वा मजला, अभि. डेपो., मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००0८ ई-निविदा., अनु.क्र. (१) निविदा सूचना क्र: बीसीटी/२४-२५/१७६ दि. २४/०९/२०२४ मागवीत आहेत., काम आणि ठिकाण: जोरावसन-सूरत अनु.१ वर्ष (२०२४-२५) कालावधीकरिता एसएसई(पी. वे), सूरत अनुभागा अंतर्गत पी.वे ची दुरुस्ती. संयुक्त निविदा (अभि.+ एसआणिटी)., अंदाजे कामाचे मूल्य: रु. ४,७९,८१,८९२.४०/-., ईरठे: रु. ३,८९,९००.००/-., अनु. क्र.(२) निविदा सूचना क्र: बीसीटी/२४-२५/१७७ दि. २४/०९/२०२४., काम आणि ठिकाण: उधणा-ऊकाई सोनगढ अनुभाग: एसएसई(पीवे) अंतर्गत अप/डीएन लाईनच्या पी.वेची देखभाल- वर्ष २०२४-२५ करिता बारडोली अधिकारक्षेत्र, (किमी ३.१८० पासून ते ४५.००) (एस आणि टी कामांसह संयुक्त निविदा)., अंदाजे कामाचे मूल्य: रु. ४,२५,०४,७५६.९७/-., ईरठे: रु. ३,६२,५००.००/-., दोन्ही निविदा: सादरीकारणाचा दिनांक आणि वेळ: २२/१०/२०२४ रोजी १५:०० वाजेपर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २२/१०/२०२४ रोजी १५:३० वाजता. अधिक तपशीलासाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट ए दया. प्रत्यक्ष प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत
0579
आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly



**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)**
म्हाडा MHADA

**निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी.एम.सी. फ दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई - ४०००१२. यांचेकडे म्हाडा / सिडको/पी.डब्ल्यू. डी / सी. पी. डब्ल्यू. डी/एम. आय. डी. सी. / बी.पी.टी./एम.ई.एस. भारतीय रेल्वे किंवा शासकीय / निमशासकीय संस्थेत इतर संस्थेमध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या व बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून बी १ फॉर्ममध्ये [टक्केवारी दर] सिलबंद निविदा मागवित आहोत. ज्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी स्तंभ क्र. १० मध्ये दर्शविलेल्या योग्य वर्गाच्या पुनर्रचित इमारती खालीलप्रमाणे.

| अ. क्र | कामाचे नांव | निविदा रक्कम | १% इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कोऱ्या निविदा विक्रीची रक्कम [ विना परतावा रु. १८% GSTसह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| १. | उपकरप्राप्त इमारत क्र. ६८, मंत्री निवास, परळ गांव मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरस्ती काम करणे [आमदार निंधीचे काम ] | ३,४०,७५२/- | ३४०८.०० | ७०००.०० | ५९०.०० | दि. ०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | ०८ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| २. | उपकरप्राप्त इमारत क्र. ६२ए-६२एफ अन्नपूर्णा परळगांव, मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरस्ती काम करणे निधीचे काम करणे [आमदार निधीचे काम ] | ५,४६,६२१/- | ५४६६.०० | ११०००.०० | ५९०.०० | दि. ०३/१०/२०२४ ते दि. ११/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १४/१०/२०२४ ते दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |

1. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकर सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रककम०८ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
2. कोऱ्या निविदा म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग / कें. सा.बां.वि/रेल्वे / बीपीटीए अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणाकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्याए पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
3. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
4. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सदर करावे.
5. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ.दु. व पु.मंडळ यांच्या नावावर द्यावी.
6. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता पद विभाग, फ[द] विभाग तिसरा मजला अक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मंबई- १२. यांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्यतो दि. १५/१०/२०२४ रोजी दुपारी ३. ०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ[द] विभाग मुं.इ. दु. व पु.मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
7. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारजी जाणार नाही.
8. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामचा / वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता [सिव्हिल इंजिनियर आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
9. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने/ साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
10. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकारी सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येत आहे.
11. मागविण्यात आलेली निविदा सन २०२०-२१ च्या एसएसआर वर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अदागयी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल
12. जी. एस. टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

**CPRO/A/822**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता फ [द] विभाग**
**मुं.इ.दु.व पु. मंडळ**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

## अमेरिकेचे सीरियात 2 हवाई हल्ले

**दमास्कस :** :सीरियन इस्लामिक स्टेट आणि अल कायदाशी संबंधित दहशतवादी गटांच्या तळांवर अमेरिकेने हल्ला केला. यामध्ये 37 दहशतवादी मारले गेले आहेत. अमेरिकन सैन्याने रविवारी सांगितले की त्यांनी दोन वेगवेगळ्या दिवशी सीरियामध्ये ऑपरेशन केले. यूएस सेंट्रल कमांडच्या म्हणण्यानुसार, 16 सप्टेंबर रोजी मध्य सीरियामध्ये ISIS च्या प्रशिक्षण केंद्रावर हवाई हल्ला करण्यात आला. यामध्ये 28 दहशतवादी मारले गेले. यानंतर 24 सप्टेंबर रोजी अमेरिकन लष्कराने उत्तर-पश्चिम सीरियावर हल्ला केला, ज्यामध्ये अल कायदा गटाचे 9 दहशतवादी मारले गेले. 24 सप्टेंबरला मारल्या गेलेल्या एका दहशतवाद्याची ओळखही समोर आली आहे. या हल्ल्यात अल कायदा संघटनेशी संबंधित हुर्रास अल-दिनचा प्रमुख नेता 'अब्द-अल-रौफ' मारला गेला आहे, अशी माहिती अमेरिकन लष्कराने दिली आहे. अमेरिकेने फेब्रुवारीमध्ये सीरियातील अनेक इराणी लक्ष्यांवर हल्ले केले होते. 74% सुन्नी आणि 10% शिया लोकसंख्या असलेला सीरिया हा मुस्लिम बहुसंख्य देश आहे. अत्यंत कमी लोकसंख्या असूनही, सीरियामध्ये शिया नेता बशर अल-असदचे राज्य आहे. बशरला हटवण्यासाठी २०११ मध्ये सीरियात संघर्ष सुरू झाला होता.



# मदतीसाठी गेलेले अंतराळयान अंतराळ स्थानकावर पोहोचले

## रशियन व अमेरिकन अंतराळवीरांना घेऊन गेले, सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोरसह परत येणार

**वृत्तसंस्था**
**वॉशिंग्टन**

अब्जाधीश एलॉन मस्क यांची कंपनी स्पेसएक्सचे ड्रॅगन अंतराळयान रविवारी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (ISS) पोहोचले. रशियन अंतराळवीर अलेक्झांडर गोर्बुनोव आणि नासाचे अंतराळवीर निक हेग या यानात होते. अंतराळयान वाहून नेणाऱ्या फाल्कन 9 रॉकेटने शनिवारी दुपारी फ्लोरिडातील केप कॅनवेरल लॉन्च पॅडवरून उड्डाण केले.

5 जूनपासून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (ISS) अडकलेल्या भारतीय वंशाच्या



अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना ड्रॅगन अंतराळ यानाद्वारे पृथ्वीवर परत आणले जाईल. या चार आसनी रॉकेटमध्ये दोन जागा रिक्त ठेवण्यात आल्या आहेत.

सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना या वर्षी 5 जून रोजी बोईंगच्या नवीन स्टारलाइनर कॅप्सूलमध्ये ISS मध्ये पाठवण्यात आले होते.

सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना या वर्षी 5 जून रोजी बोईंगच्या नवीन स्टारलाइनर कॅप्सूलमध्ये ISS मध्ये पाठवण्यात आले होते. दोघेही 29 सप्टेंबरपर्यंत 116 दिवस तिथे अडकून आहेत.

नासाच्या प्रमुखांनी 24 ऑगस्टला सांगितले होते की, सुनीता विल्यम्स आणि बुच 6 महिन्यांनंतर फेब्रुवारी 2025 पर्यंत पृथ्वीवर परततील. बोइंगच्या नवीन स्टारलाइनर कॅप्सूलमध्ये अंतराळवीरांना आणणे धोकादायक ठरू शकते, असे नासाने मान्य केले होते. नासाने सांगितले होते की सुनीता आणि बुच विल्मोर फेब्रुवारीमध्ये एलॉन मस्क यांची कंपनी स्पेसएक्सच्या ड्रॅगन यानातून परततील.

सुनीता आणि विल्मोर बोइंग आणि नासाच्या संयुक्त 'क्रू फ्लाइट टेस्ट मिशन'वर गेले होते. यामध्ये सुनीता या यानाच्या पायलट होत्या. त्यांच्यासोबत आलेले विल्मोर हे या मिशनचे कमांडर होते. इंटरनॅशनल स्पेस स्टेशन (ISS) मध्ये 8 दिवस राहून दोघेही पृथ्वीवर परतणार होते.

प्रक्षेपणाच्या वेळी, बोईंग डिफेन्स, स्पेस अँड सिक्युरिटीचे अध्यक्ष आणि सीईओ टेड कोलबर्ट यांनी याला अंतराळ संशोधनाच्या नवीन युगाची उत्तम सुरुवात म्हटले. अंतराळवीरांना अंतराळ स्थानकावर घेऊन जाण्याची आणि त्यांना परत आणण्याची अवकाशयानाची क्षमता सिद्ध करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. अंतराळवीरांनाही अवकाश स्थानकावर 8 दिवसांत संशोधन आणि अनेक प्रयोग करायचे होते. सुनीता आणि विल्मोर हे पहिले अंतराळवीर आहेत ज्यांना ॲटलस-व्ही रॉकेटचा वापर करून अंतराळ प्रवासासाठी पाठवण्यात आले होते. या मोहिमेदरम्यान त्यांना अंतराळयानही हाताने उडवायचे होते. उड्डाण चाचणीशी संबंधित अनेक प्रकारची उद्दिष्टेही पूर्ण करायची होती.

# राहुल गांधी ओबीसींचीच लढाई लढतायत...



**वृत्तसंस्था**
**रेवाडी**

राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत सोमवारी हरियाणातील रेवाडी शहरात एका निवडणूक रॅलीला संबोधित करण्यासाठी दाखल झाले. यावेळी गेहलोत यांनी भाजपच्या केंद्र आणि हरियाणा सरकारवर जोरदार हल्लाबोल करत 8 तारखेला भाजप हरियाणामध्ये जात आहे आणि काँग्रेस येणार आहे.

गेहलोत म्हणाले की, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे ओबीसींची खरी लढाई लढत आहेत. ओबीसींना त्यांचे हक्क मिळाले पाहिजेत. हरियाणा सरकारने साडेनऊ वर्षांपासून ओबीसी समाजाच्या प्रमुख मागण्या दडपल्या. निवडणुका आल्या की त्यांना ओबीसी समाजाची आठवण होते. मात्र यावेळी हरियाणातील ओबीसी समाजाचे मतदार त्यांना चोख प्रत्युत्तर देतील.

अशोक गेहलोत म्हणाले की, तुमच्या शेजारचे राज्य राजस्थान आहे. आमच्या सरकारने तेथील प्रत्येक कुटुंबाचा 25 लाख रुपयांचा आरोग्य विमा कव्हर केला. राजस्थानमध्ये काँग्रेसच्या काळात समाजातील सर्व घटकांसाठी लाभदायक योजना सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र भाजपने येताच अनेक योजना बंद पाडल्या. हरियाणात आमचे सरकार आल्यावर शेतकरी, पैलवान आणि सैनिकांसाठी अनेक योजना राबवल्या जातील, असेही गेहलोत म्हणाले. याशिवाय महिलांना दरमहा दोन हजार रुपये दिले जाणार आहेत.

अशोक गेहलोत यांच्याशिवाय काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी, आरजेडीचे खासदार मनोज झा, योगेंद्र यादव यांनीही रेवाडी शहरातील किसान वाटिका येथे आयोजित केलेल्या जाहीर सभेला संबोधित केले. मनोज झा म्हणाले की, धर्मादाय म्हणून 5 किलो रेशन देणाऱ्या सरकारची नाही, तर आमच्या हक्कांसाठी लढणाऱ्या सरकारची गरज आहे.

# शाळेत मुलीवर बलात्कार

## पालकांनी शाळा केली सील

**रतलाम**

रतलाम येथील एका खासगी शाळेत 5 वर्षांच्या मुलीवर झालेल्या बलात्कारानंतर पालक संतप्त झाले आहेत. सोमवारी सकाळी पालक जमले आणि शाळा गाठली. येथे शाळेबाहेर संचालक आणि मुख्याध्यापकांच्या विरोधात घोषणाबाजी सुरू झाली. ते चकरा मारत रस्त्यावर बसले. वाढता गोंधळ पाहून प्रशासनाने शाळा बंद केली. शाळेचे संचालक, मुख्याध्यापक व इतर कर्मचाऱ्यांना मागील गेटमधून सुखरूप बाहेर काढण्यात आले. प्रशासनाने शाळा सील केली. अधिकाऱ्यांनी कारवाईचे आश्वासन दिले, त्यानंतरच पालक शांत झाले. एका खासगी शाळेत पाच वर्षांच्या मुलीवर बलात्कार झाल्याची घटना रविवारी उघडकीस आली. मुलगी यूकेजीमध्ये शिकते. आरोपी हा शाळेच्या चौकीदाराचा मुलगा आहे. तो शाळेच्या दुसऱ्या शाखेत दहावीचा विद्यार्थी आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला बालनिरीक्षण गृहात पाठवले होते. सकाळी नेहमीप्रमाणे शाळा सुरू झाली. 9.30 च्या सुमारास हिंदू संघटनेचे अधिकारी आणि पालक शाळेबाहेर जमले. हळूहळू आणखी पालकही शाळेत पोहोचले. शाळा व्यवस्थापनाविरोधात घोषणाबाजी सुरू केली. माहिती मिळताच एसडीएम अनिल भाना, तहसीलदार ऋषभ ठाकूर, सीएसपी अभिनव बारंगे, आयए पोलिस स्टेशनचे प्रभारी व्हीडी जोशी फौजफाट्यासह पोहोचले.

# हिटलरनंतर नेतान्याहू हे सर्वात मोठे दहशतवादी

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

ज्यू नेत्याने पॅलेस्टाईन आणि लेबनॉनला गॅस चेंबरमध्ये रूपांतरित केल्यामुळे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू हे ॲडॉल्फ हिटलरनंतरचे सर्वात मोठे दहशतवादी असल्याचे पीडीपीच्या अध्यक्षा मेहबूबा मुफ्ती यांनी सोमवारी सांगितले.

मेहबूबा म्हणाल्या, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने नेतान्याहू यांच्याविरोधात निकाल दिला आहे. लेबनॉनवरील हल्ल्याने ते गुन्हेगार असल्याचे सिद्ध झाले आहे. पॅलेस्टाईननंतर आता तो लेबनॉनमध्येही हजारो लोकांची हत्या करत आहे.

यापूर्वी मेहबूबा यांनी इस्रायली हवाई हल्ल्यात हिजबुल्ला प्रमुख



हसन नसराल्लाहच्या हत्येचा निषेध केला होता. आणि लेबनॉन-पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आपला निवडणूक प्रचार एक दिवसासाठी रद्द केला होता.

नसराल्लाह यांच्या मृत्यूची बातमी कळताच बडगाममध्ये 28 सप्टेंबर रोजी मिरवणूक काढण्यात आली होती.

भारत-इस्रायल मैत्रीवर नेतन्याहू सरकारशी संबंध कायम ठेवण्याचा सरकारचा निर्णय चुकीचा आहे. महात्मा गांधींच्या काळापासून आपण पॅलेस्टाइनच्या पाठीशी उभे आहोत. सरकारशी संबंध ठेवणे आणि लोकांना मारण्यासाठी वापरली जाणारी शस्त्रे आणि ड्रोन पुरवणे, हा चुकीचा निर्णय आहे असे मला वाटते. नसराल्लाह यांना शहीद म्हटल्यावर भाजप मला काय सांगेल? पॅलेस्टाइनच्या लोकांसाठी नसराल्लाह यांच्या प्रदीर्घ संघर्षाबद्दल त्यांना (भाजप) काय माहिती आहे? काश्मीर, लखनऊ आणि देशाच्या इतर भागांतून किती लोक बाहेर पडतात आणि शहिदांच्या स्मरणार्थ घोषणा देत आहेत, हे त्यांनी पाहावे. त्यांची विचारसरणी किती चुकीची आहे हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे.

जम्मू-काश्मीरच्या बडगाममध्ये नसराल्लाह यांच्या समर्थनार्थ रॅली काढण्यात आली 28 सप्टेंबर रोजी X वरील पोस्टमध्ये, मेहबूबा यांनी लेबनॉन आणि गाझा, विशेषतः हसन नसराल्लाह याच्या हौतात्म्याबद्दल रविवारची निवडणूक प्रचार रद्द करत असल्याचे सांगितले. त्या म्हणाल्या की, या दु:खाच्या क्षणी आम्ही पॅलेस्टाईन आणि लेबनॉनच्या लोकांच्या पाठीशी उभे आहोत. दुसरीकडे, जम्मू-काश्मीरच्या बडगाममध्ये नसराल्लाहच्या समर्थनार्थ लोकांनी रॅलीही काढली.

खरं तर, 27 सप्टेंबर रोजी रात्री 9:30 वाजता इस्रायलने लेबनॉनची राजधानी बैरुतमध्ये हवाई हल्ले केले, ज्यात नसराल्लाह मारला गेला. इस्रायली सैन्याने हिजबुल्लाहच्या मुख्यालयावर 80 टन वजनाच्या बॉम्बने हल्ला केला.

# बनावट नोटा देऊन 1.60 कोटी रुपयांची सोने खरेदी

## नोटांवर अनुपम खेर यांचा फोटो

**वृत्तसंस्था**
**अहमदाबाद**

गुजरातमध्ये बनावट नोटांचा वापर करून फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सराफा व्यापारी मेहुल ठक्कर याच्याकडून या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. 1 कोटी 30 लाख रुपयांची ही रोख रक्कम एका व्यक्तीने 2100 ग्रॅम सोन्याची बिस्किटे विकत घेण्याच्या बदल्यात दिल्याचे व्यावसायिकाने सांगितले. मशीनमधून पैसे मोजले जाऊ लागले तेव्हा या नोटा बनावट असल्याचे उघड झाले. नोटांवर महात्मा गांधींऐवजी बॉलिवूड अभिनेते अनुपम खेर यांचा फोटो छापण्यात आला आहे. त्याचबरोबर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ऐवजी रिसोल बँक ऑफ इंडिया असे लिहिले आहे. पोलिसांनी तीन अनोळखी तरुणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. यामागील सूत्रधार कोण आणि या नोटा कुठे छापल्या गेल्या याचा तपास पोलीस करत आहेत. शहरातील प्रल्हाद नगर भागातील पुष्पकदील बंगला येथे राहणारे व्यापारी मेहुल ठक्कर यांच्या दागिन्यांचे दुकानात ही घटना घडली.

## राममंदिरात नाच-गाणे वक्तव्यावर योगी संतप्त

# गांधी कुटुंबाने कायम नाचगाणेच केले

**वृत्तसंस्था**
**लखनऊ**

मुख्यमंत्री योगींनी राम मंदिरात नाच-गाणे या राहुल गांधींच्या वक्तव्यावर पलटवार केला. म्हणाले- हे लोक म्हणतात नाच-गाणे अयोध्येत झाले, तुमचे कुटुंब हे आयुष्यभर करत आले आहे. हे लोक भारताबाहेर जाऊन देशाला शिव्या देतात आणि स्वतःला अपघाती हिंदू म्हणवून घेतात.

मुख्यमंत्री म्हणाले, 500 वर्षांची प्रतीक्षा 22 जानेवारीला संपली. रामलल्लाची अयोध्येत प्राणप्रतिष्ठा झाली. सारे जग भारावून गेले आहे, पण या दुर्दैवी काँग्रेसवाल्यांना त्याचा अधिकच तिरस्कार आहे. रामाची संस्कृती आणि रोमची संस्कृती यात हाच फरक आहे.

योगी हरियाणातील बावानी खेडा येथे एका जाहीर सभेला संबोधित करत होते. ते म्हणाले-



राम संस्कृतीत वाढलेली प्रत्येक व्यक्ती रामाच्या संकल्पाने ५०० वर्षे लढत राहिली. त्याचा परिणाम आज आपल्यासमोर आहे. प्रभू राम पुन्हा विराजमान झाले.

काँग्रेसने भारतीय संस्कृती पायदळी तुडवली अयोध्येत 500 वर्षे युद्ध करण्याची गरज का होती? मुघलांनी हल्ला केला. सनातन संस्कृतीचे नाव राहू नये असे त्यांना वाटत होते. इंग्रजांनाही ते नको होते. काँग्रेसने भारतीय संस्कृतीही पायदळी तुडवली आहे.

140 कोटी भारतीय आनंदी, काँग्रेस यामुळे त्रस्त आहे नरेंद्र मोदी 2014 मध्ये देशाचे पंतप्रधान झाले. 2017 मध्ये यूपीमध्ये भाजपचे सरकार आले. 500 वर्षे जुनी समस्या 2 वर्षात सोडवली. डबल इंजिन सरकारची ही ताकद आहे. दुहेरी इंजिन सरकारची ताकद संपूर्ण भारताला जाणवत आहे. 140 कोटी भारतीय आनंदी आहेत. काँग्रेसला यातही अडचणी आहेत. काँग्रेस जेव्हा येईल तेव्हा देशाचा विश्वासघात करेल जेव्हा-जेव्हा काँग्रेसचे लोक येतात. देशाचा विश्वासघात करणार. त्यांनी देशाची फाळणी केली. घर भरत राहिले. भारतातील परंपरांना शाप दिला. हरियाणात डबल इंजिन सरकारमुळे कनेक्टिव्हिटी सुधारली. इथेही झपाट्याने विकास झाला. काँग्रेसने विकास केला असता, तर मोदीजींना कोरोनाच्या काळापासून ८० कोटी लोकांना मोफत रेशनची सुविधा द्यावी लागली नसती.

# भाजपचे आमदार विकास करु शकत नाहीत!

**वृत्तसंस्था**
**पलवल**

पलवलमध्ये चित्रपट अभिनेते राज बब्बर म्हणाले की, भाजपचे आमदार विधानसभेत जनतेचा आवाज बुलंद करू शकत नाहीत, त्यामुळे पलवल विकासात मागे पडले. राज बब्बर पंजाबी भाषेत मजेदार टोनमध्ये बोलून लोकांना हसवताना दिसले.

चित्रपट अभिनेता राज बब्बर पंजाबी धर्मशाळा पलवल येथे काँग्रेस उमेदवार करण सिंह दलाल यांच्या बाजूने आयोजित केलेल्या निवडणूक रॅलीला संबोधित करत होते. बब्बर म्हणाले की, करणसिंग दलाल यांना प्रचंड मतांनी विजयी करा, जेणेकरून ते राज्याचे मोठे मंत्री होऊ



शकतील. राज बब्बर म्हणाले की, प्रेम, आपुलकी आणि विश्वास यापेक्षा मोठे कोणतेही नाते किंवा धर्म नाही. सर्व धर्म श्रद्धा आणि विश्वासावर आधारित आहेत. त्यामुळे हाताचे बटण दाबून करणसिंग दलाल यांना विजयी करण्याचा संकल्प प्रत्येकाने केला पाहिजे.

पलवलच्या विकासात आपला पंजाबी समाज आणि व्यापारी वर्गातील लोकांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे ते म्हणाले. राज बब्बर म्हणाले की, राज्यात येणारे सरकार काँग्रेस पक्षाचे आहे. काँग्रेसचे सरकार आल्यानंतर करणसिंग दलाल यांचाही हिस्सा मोठा होणार आहे. पलवल जिल्ह्यातील तीनही जागा काँग्रेस जिंकणार असल्याचे त्यांनी सांगितले. काँग्रेस सरकारमध्ये पलवल जिल्ह्यातील शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि रस्ते यांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे.

# कोविड लॉकडाऊनमुळे चंद्राचे तापमान घटले

## मानवी हालचाल कमी झाल्याने आणि किरणोत्सर्ग घटल्याने तापमान घसरल्याचे संशोधकांचे निरीक्षण

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

कोविड लॉकडाऊननंतर चंद्राचे तापमान 8 ते 10 अंशांनी कमी झाल्याचे एका भारतीय संशोधनातून समोर आले आहे.

भौतिक संशोधन प्रयोगशाळेच्या (पीआरएल) के. दुर्गा प्रसाद आणि जी अंबिली यांनी 2017 आणि 2023 दरम्यान NASA च्या लुनार Reconnaissance Orbiter मधील सहा वेगवेगळ्या ठिकाणांवरील डेटाचे विश्लेषण केले.

संशोधनातून समोर आले आहे की पृथ्वीवरील लॉकडाऊनमुळे मानवी क्रियाकलाप जवळजवळ थांबले होते, ज्यामुळे रेडिएशनमध्ये घट झाली. त्यामुळे चंद्राच्या



तापमानातही घट नोंदवण्यात आली. हे संशोधन पीअर-रिव्ह्यूड मंथली नोटिस ऑफ द रॉयल ॲस्ट्रोनॉमिकल सोसायटी: लेटर्समध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. यावरून असे दिसून आले की एप्रिल आणि मे महिन्यात चंद्राच्या तापमानात लक्षणीय घट दिसून आली, जेव्हा लॉकडाऊन सर्वात कडक होता.

2020 मध्ये पाहिलेले सर्वात कमी तापमान 2020 मध्ये चंद्रावर एका ठिकाणी 96.2 अंश तापमानाची नोंद झाली होती. जे आजपर्यंत चंद्राचे सर्वात कमी तापमान मानले जात होते. 2022 मध्ये एका ठिकाणी तापमान 143.8 अंश नोंदवले गेले. साधारणपणे, 2020 मध्ये चंद्राच्या बहुतेक ठिकाणी कमी तापमान दिसून आले. यानंतर पृथ्वीवर पुन्हा मानवी हालचाली सुरू झाल्याने तापमानात पुन्हा वाढ झाल्याचे दिसून आले. एक प्रकारे, चंद्र पृथ्वीच्या रेडिएशन साइनच्या ॲम्प्लिफायरसारखे कार्य करतो. संशोधनाअंती असे आढळून आले की, नैसर्गिक क्रियांसोबतच मानवी क्रियाकलापांचाही चंद्राच्या तापमानावर परिणाम होतो.

के. दुर्गा प्रसाद म्हणाले की, या संशोधनाद्वारे आम्हाला समजले की पृथ्वीवरील मानवी क्रियाकलापांमध्ये चंद्रावर परिणाम होतो. 24 मार्च 2020 रोजी संध्याकाळी भारतात पहिला लॉकडाऊन लागू करण्यात आला कोविडमुळे जगभरात सुमारे 70 लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. 30 जानेवारी 2020 रोजी जागतिक आणीबाणी घोषित करण्यात आली. कोविडमुळे अमेरिकेत सर्वाधिक लोकांचा मृत्यू झाला. या महामारीच्या काळात संपूर्ण जग घरात कैद झाले होते. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणारा भारत हा पहिला देश 23 ऑगस्ट 2023 रोजी संध्याकाळी 6:02 वाजता चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणारा भारत जगातील पहिला देश ठरला. चांद्रयान-३ ने सॉफ्ट लँडिंग करताच एक संदेश दिला - भारत, मी गंतव्यस्थानावर पोहोचलो आहे आणि तुम्ही देखील हा संदेश पाठवला आहे.

# हरियाणात पिता-पुत्रांचे सरकार आम्ही बनू देणार नाही !



**वृत्तसंस्था**
**पंचकुला**

निवडणूक प्रचारासाठी हरियाणात पोहोचलेले आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांनी प्रश्न उपस्थित केला की जर भारताचे पंतप्रधान ओबीसी आहेत, तर विरोधी पक्षनेते ओबीसी का असू शकत नाहीत, असेही ते म्हणाले की, राहुल गांधी पक्ष स्थापन करणार आहेत. दिल्लीत माता-पुत्राचे सरकार हवे होते, पण ते यशस्वी झाले नाही. आता हरियाणात पिता-पुत्रांचे सरकार बनवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, परंतु आम्ही तुम्हाला सांगतो की, येथे भाजपच तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार आहे. हिंदू शहीद झाल्यावर ते कधीच रडत नाहीत, असेही ते म्हणाले. बिस्वा शर्मा हे सोमवारी पंचकुलाच्या कालका येथे भाजप उमेदवार शक्ती राणी यांच्या समर्थनार्थ जाहीर सभेला संबोधित करत होते. हेमंत बिस्वा शर्मा यांनी पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा देणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली. ते म्हणाले की, मी नायब सैनी यांना सांगेन की, 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या घोषणा देणाऱ्यांना पिटाळून तुरुंगात टाका.

# जम्मू-काश्मीरच्या 40 जागांसाठी आज मतदान

## शेवटच्या टप्प्यात 415 उमेदवार

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या आणि तिसऱ्या टप्प्यात उद्या मंगळवारी (1 ऑक्टोबर) 7 जिल्ह्यांतील 40 विधानसभा जागांवर मतदान होणार आहे. यामध्ये 39.18 लाख मतदारांचा समावेश असेल. तिसऱ्या टप्प्यातील 40 जागांपैकी 24 जागा जम्मू विभागातील आणि 16 काश्मीर खोऱ्यातील आहेत. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, शेवटच्या टप्प्यात 415 उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये 387 पुरुष आणि 28 महिला उमेदवार आहेत.

तिसऱ्या टप्प्यात 169 उमेदवार कोट्यधीश असून 67 उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. नगरोटा, जम्मू येथील भाजपचे उमेदवार देवेंद्र सिंह राणा यांच्याकडे सर्वाधिक 126 कोटी रुपयांची संपत्ती आहे. या टप्प्यात संसदेवरील हल्ल्याचा मास्टरमाइंड अफझल गुरूचा मोठा भाऊ एजाज अहमद गुरूही निवडणुकीच्या रिंगणात आहेत. एजाज गुरु हे सोपोर मतदारसंघातून अपक्ष उमेदवार आहेत. इंजिनिअर रशीदचा भाऊ खुर्शीद अहमद शेख उत्तर काश्मीरच्या लंगेट जागेवरून निवडणूक लढवत आहेत. माजी उपमुख्यमंत्री मुझफ्फर हुसैन बेग बारामुल्लामधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत.

18 सप्टेंबर रोजी पहिल्या टप्प्यातील 24 विधानसभा जागांवर मतदान झाले. या कालावधीत 61.38% मतदान झाले. 25 सप्टेंबर



रोजी 6 जिल्ह्यांतील 26 विधानसभा जागांवर 57.31% मतदान झाले.

तिसऱ्या टप्प्यात जम्मू जिल्ह्यातील सर्वाधिक 11 जागांवर मतदान होणार आहे. बारामुल्लाच्या 7, कुपवाडा आणि कठुआच्या 6-6, उधमपूरच्या 4 आणि बांदीपोरा आणि सांबाच्या 3-3 जागांवर मतदान होणार आहे. बारामुल्ला जागेसाठी सर्वाधिक 25 उमेदवार रिंगणात आहेत. जम्मूच्या अखनूरमध्ये 3 उमेदवारांमध्ये लढत आहे. शेवटच्या टप्प्यात पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी (पीडीपी) 33 जागांवर निवडणूक लढवत आहे. युती करून निवडणूक लढवत असलेल्या नॅशनल कॉन्फरन्सने 18 जागांवर उमेदवार उभे केले आहेत तर काँग्रेसने 24 जागांवर उमेदवार उभे केले आहेत. भाजपकडे 29 उमेदवार आहेत. तसेच 155 अपक्ष उमेदवार रिंगणात आहेत. नॅशनल कॉन्फरन्सचे 90% उमेदवार कोट्यधीश आहेत, 6 उमेदवारांकडे शून्य संपत्ती आहे